सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. २२ जुलै २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ११० | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# ७/११ मुंबई बॉम्बस्फोट: सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

## हायकोर्टाचा धक्कादायक निकाल; महाराष्ट्र एटीएस सर्वोच्च न्यायालयात जाणार!

मुंबई: देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला ११ जुलै २००६ रोजी हादरवून सोडणाऱ्या लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणावर आज मुंबई उच्च न्यायालयाने एक अत्यंत धक्कादायक निकाल दिला आहे. या स्फोटांमध्ये २८४ जणांचा मृत्यू झाला होता, तर ८०० पेक्षा अधिक जखमी झाले होते. या प्रकरणात तपास यंत्रणांनी अटक केलेल्या १२ आरोपींपैकी सत्र न्यायालयाने ४ आरोपींना फाशीची, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा हा निकाल पूर्णपणे फिरवत, सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

एटीएसची भूमिका आणि पुढील पाऊल

२००६ च्या पश्चिम रेल्वे साखळी बॉम्बस्फोट खटल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्र राज्य, दहशतवाद विरोधी पथकाने (-ढड) आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ३० सप्टेंबर २०१५ रोजी मोक्का विशेष न्यायालयाने या प्रकरणात ५ आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा आणि ७ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, तर एका आरोपीची निर्दोष मुक्तता केली होती. मात्र, मृत्युदंडाच्या संदर्भात आणि दोषी आरोपींच्या अपीलवर



उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती किलोर आणि न्यायमूर्ती चांदक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती.

या खटल्यात अतिरिक्त सॉलिसिटर जनरल राजा ठाकरे आणि विशेष सरकारी वकील चिमलकर यांनी राज्य सरकारची बाजू मांडली होती. जुलै २०२४ पासून या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती आणि २७ जानेवारी २०२५ रोजी अभियोग तसेच बचाव पक्षाचे युक्तिवाद पूर्ण झाले होते. आज, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निकाल दिला, ज्यामध्ये मृत्युदंडाचे संदर्भ नाकारण्यात आले आणि दोषी आरोपींचे अपील मान्य करण्यात आले. विशेष न्यायालयाचा निकालही रद्द करण्यात आला आहे.

दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने म्हटले आहे की, या खटल्याच्या विशेष अभियोक्तांशी सल्लामसलत करून आणि निकालाच्या सखोल विश्लेषणानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल. महाराष्ट्र एटीएसने मुंबई उच्च न्यायालयाच्या या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याची तयारी केली आहे. सर्वोच्च न्यायालयात जाण्यापूर्वी उच्च न्यायालयाच्या निकालाचे अवलोकन करून त्याचा सखोल अभ्यास केला जाईल आणि सरकारी वकिलांशी चर्चा करूनच ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

### बशीर खान आणि मुजम्मिल शेख हे दोन आरोपी लवकरच बाहेर येणार!

उच्च न्यायालयाच्या या निकालानंतर अनेकांना धक्का बसला असून, सध्या पुण्यातील येरवडा कारागृहात असलेले बशीर खान आणि मुजम्मिल शेख हे दोन आरोपी लवकरच बाहेर येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या निकालावर सर्व स्तरांतून आश्चर्य व्यक्त होत असून, ज्येष्ठ विधिज्ञ आणि खासदार उज्वल निकम यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. आता, या प्रकरणी महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# कुटुंबव्यवस्था सक्षम करण्यासाठी 'स्वप्न तुझे माझे' उपक्रम प्रभावीपणे राबवा- विजया रहाटकर

छत्रपती संभाजीनगर,दि.२१ – राष्ट्रीय महिला आयोगातर्फे राबविण्यात येत असलेला 'स्वप्न तुझे माझे' हा विवाहपूर्व संवादाचा उपक्रम आहे. यात संवादाद्वारे उपाययोजना होतात. कुटुंब व्यवस्था सक्षम करणारा हा उपक्रम जिल्ह्यात प्रभावीपणे राबवावा,असे निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती विजया रहाटकर यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात श्रीमती रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक झाली. बैठकीपूर्वी श्रीमती रहाटकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील 'स्वप्न तुझे माझे' च्या विवाहपूर्व संवाद केंद्र येथे भेट देऊन पाहणी केली. तसेच जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या वाचन कट्टा, हिरकणी कक्ष अशा उपक्रमांचीही पाहणी केली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी त्यांचे स्वागत केले.



त्यानंतर झालेल्या बैठकीस श्रीमती रहाटकर यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. शिवानी डे, उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, डॉ. सुचिता शिंदे, माविम चे व्यवस्थापक चंदनसिंग राठोड तसेच अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

महिला सक्षमीकरण उपक्रमांचे सादरीकरण

जिल्हाधिकारी स्वामी यांनी जिल्हा प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिला सक्षमीकरण उपक्रमांची माहिती दिली. त्यात प्रामुख्याने बेटी बचाओ बेटी पढाओ, बाल विवाह प्रतिबंध, महिलांसाठी आर्थिक साक्षरता, पिंक ई रिक्षा, तक्रार समित्या, प्रशिक्षण, मुलींचा जन्मदर वाढविणे, शाळा बाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, बाल भिक्षेकरी, बाल कामगार यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे अशा विविध उपक्रमांची व त्याच्या फलश्रुतीची माहिती देण्यात आली.

विवाहपूर्व संवाद आवश्यक

श्रीमती रहाटकर यांनी राष्ट्रीय महिला आयोगाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची, योजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 'स्वप्न तुझे माझे', हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कुटुंब व्यवस्था सक्षम आणि बळकट करण्यासाठी हा उपक्रम आहे. या उपक्रमात विवाहपूर्व संवाद याद्वारे घडवीला जातो. लग्न ठरण्याआधी दोन्हीकडच्या कुटुंबांना आपापसात भेटून संवाद साधता येतो. यात नवरा मुलगा, मुलगी, सासू, सून, नणंद असे विविध नातेवाईक आपापसात भेटून आपल्या नात्यांबद्दल संकल्पना स्पष्ट करू शकता. त्याद्वारे संभाव्य वाद, ताणतणाव यांचे निराकरण वेळीच होऊ शकते व दोन जणांचा संसार सुखाचा होऊ शकतो, अशी यात संकल्पना आहे. हा उपक्रम जिल्हा प्रशासनाने पुढे न्यावा,असे आवाहन त्यांनी केले.

लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण

त्यांनी अधिक माहिती दिली की, महिला आयोग महिलांविषयक तक्रारींची तातडीने दखल घेतो. १७ विविध स्वतंत्र कक्षांद्वारे हे कामकाज चालविले जाते. ती बदल घडवते या उपक्रमांतर्गत देशातील सर्व महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणानंतरही आयोग सतत संपर्कात राहतो. महिलांविषयक कायदे तयार करण्यात महिला आयोगाच्या संशोधन उपक्रमांचे मोठे योगदान असते.


विविध क्षेत्रातील महिलांना 'कृत्रिम बुद्धिमत्ता' प्रशिक्षण

त्यांनी सांगितले की, आता राष्ट्रीय महिला आयोगा मार्फत घेण्यात येणाऱ्या सुनावण्या या विभागस्तरीय मुख्यालयांच्या ठिकाणी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यापीठांमध्ये 'कॅम्पस कॉलिंग' हा उपक्रम राबवून १००० पेक्षा अधिक कार्यक्रम घेण्यात येतील. महिलांना त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण देण्यात येणार आहे. 'यशोदा' असे या उपक्रमाचे नाव असेल. त्यात अंगणवाडी सेविका ते विविधस्तरातील महिलांना प्रशिक्षित करण्यात येईल,असे त्यांनी स्पष्ट केले.

# क्रिप्टो एक्सचेंजमध्ये ३८० कोटींची चोरी !

मुंबई प्रतिनिधी: कॉईन डीसीएक्स या क्रिप्टोकरन्सी एक्सचेंजमध्ये ३८० कोटींच्या चोरीचा धक्कादायक प्रकार घडला आहे. सुत्रांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १९ जुलैला घडली आहे. तज्ञांच्या माहितीनुसार, एका अकाऊंटमध्ये हॅकरने प्रवेश करून ही चोरी घडवून आणली आहे. मात्र कंपनीकडून सगळ्या ग्राहकांचे पैसे सुरक्षित असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ज्यांचे नुकसान झालेले आहे त्याची भरपाई कंपनी करणार आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांनी काळजी करू नये असे कंपनीने म्हटले आहे.

कंपनीने त्यांच्या निवेदनात नेमक्या शब्दात म्हटले आहे की, 'कंपनीने आपल्या वापरकर्त्यांना खात्री दिली की त्यांच्या मालमत्ता सुरक्षित आणि अबाधित आहेत तसेच प्रभावित पक्षांना या उल्लंघना मुळे झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी १००% भरपाई मिळेल.' तसेच कंपनीचे सहसंस्थापक नीरज खंडेलवाल यांनी एक्सवर पोस्ट लिहित आपल्या ग्राहकांना



सुरक्षिततेसाठी खात्री दिली आहे. २० तारखेला लिहिलेल्या पोस्ट मध्ये ते म्हणाले,या घटनेचे व्यवस्थापन आणि चौकशी करण्यासाठी टीम सखोल काम करत होती. 'आज सकाळी (१७ तासांपूर्वी) आम्हाला सुरक्षा हल्ल्याचा सामना क रावा लागला ' खंडेलवाल यांनी पोस्ट केले. त्यांनी स्पष्ट केले की हा भंग केवळ भागीदाराच्या एक्सचेंजवर लिक्विडिटी प्रोव्हिजनिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या अंतर्गत खात्यापुरता मर्यादित होता.

सर्व ग्राहक मालमत्ता सुरक्षित आहेत आणि ट्रेडिंग क्रियाकलाप आणि खछ्ठ पैसे काढणे कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू आहे, असे ते म्हणाले. प्रवेश सक्षम असलेल्या वापरकर्त्यांसाठी क्रिप्टो पै से काढणे देखील चालू राहते.' प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एक्सचेंजने त्यांच्या वेब३ ट्रेडिंग प्लॅटफॉर्मला तात्पुरते थांबवले होते व त्वरित प्रतिसाद दिला, ज्यामुळे आता सामान्य कामकाज पुन्हा सुर ळीत झाले आहे.

तज्ञांच्या मते हॅकरने कुठल्या एका अकाऊंमधून लॉग इन करत त्यातून विविध मार्गाने पैसै एका करन्सीतून दुसऱ्या करन्सीत पैसै ट्रान्स्फर केले गेले. अस म्हणण्यात येत आहे की टोर्नडो कॅशचा मा ध्यमातून हा घोटाळा करण्यात आला. टोर्नडो हा एक असा प्रकार आहे ज्यातून स्त्रोत शोधणे कठीण असते. या माध्यमातून त्यांनी एक इथिरियम जमा केला. व सोलाना या कर न्सीतून इथरियम ब्लॉकचेन मधून पैसे २७ दशलक्षापेक्षा अधिक निधी दुसरीकडे वळवण्यात आला आहे. अजून नियामकांना कुठलेही ठोस पुरावे मिळालेले नाही किंवा अजून चौकशी पूर्ण झालेली नाही. त्यामुळे याबाबत अधिक माहिती मिळालेली नाही. मात्र प्राथमिक अंदाजानुसार, उत्तर कोरियातील लझारस या टोळीने हे काम केले आहे असे सांगण्यात येत आहे.

यामुळेच यानिमित्ताने पुन्हा सायबर सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# परिचारिकांच्या संपामुळे रोजच्या दोन हजारांवर शस्त्रक्रिया लांबणीवर

### राज्यातील ४५ हजार परिचारिका संपात सहभागी

मुंबई : सातव्या वेतन आयोगात स्टाफ नर्सेसची झालेली उपेक्षा आणि कंत्राटी पद्धतीने केलेल्या नियुक्त्यांच्याविरोधात राज्यातील सरकारी रुग्णालयांतील सुमारे ४५ हजार परिचारिकांनी बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले असून, राज्यातील आरोग्यसेवा पूर्णपणे कोलमडली आहे. शनिवारी या संपाचा तिसरा दिवस होता. राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये फक्त अत्यावश्यक सेवा सुरू असून नियमित शस्त्रक्रिया रद्द करण्यात आल्या आहेत. राज्यात रोज होणाऱ्या २००० हून अधिक शस्त्रक्रिया पुढे ढकलल्या जात आहेत.

सुरुवातीला सरकारी रुग्णालयांतील परिचारिकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आझाद मैदानात धरणे आंदोलन केले. मात्र या आंदोलनाची दखलच राज्य सरकारने घेतली नाही. परिणामी, गुरुवारपासून या परिचारिकांनी बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. या संपात मुंबईतील सुमारे २५०० हून अधिक परिचारिका सहभागी आहेत. जे. जे. रुग्णालयातील ९५०, जी. टी. रुग्णालयातील ३५०, कामा रुग्णालयातील परिचारिकांच्या संपामुळे आरोग्य सेवा कोलमडली ९०, सेंट जॉर्ज रुग्णालयातील ३०० आणि राज्य कामगार विमा योजना रुग्णालयातील ३००, मिरा भाईंदर ७४, कांदिवली ५०, मुलुंड ८०, वरळी ४०, पालघर ४, अंबरनाथ २ येथून परिचारिका सहभागी झाल्यने या रुग्णालयातील सेवेला फटका बसल्याचे दिसते. राज्यभरातील सरकारी दवाखान्यांमधील मिळून संपावर गेलेल्या परिचारिकांची संख्या ४५ हजारांच्या घरात असल्याचे रुग्णालय प्रशासनाने योग्य खबरदारी घेत रुग्णसेवा बाधित होणार नाही याची काळजी घेतली. रुग्णालयातील शिकाऊ परिचरिका व वरिष्ठ श्रेणी असलेल्या परिचारिकांची रुग्णकक्ष व शस्त्रक्रियागृहामध्ये नियुक्ती केली मात्र तरिही संपाचा परिणाम दिसून येत आहे.

# दरोडेखोरांची आंतरजिल्हा टोळी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद, २२ लाखांच मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ जुलै

सेनगाव शहरातील एका सोन्याचांदीच्या दुकानातील सुरक्षा रक्षकास मारहाण करून दुकानातील तीन तोळे सोने व ७५ तोळे चांदी चोरट्यांनी लंपास केली होती. या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला होता. स्थागुशाच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन बारकाईने भौतिक व तांत्रीक पुराव्याचा सखोल अभ्यास करून अनेक सीसीटीव्ही फुटेज तपासून परभणी जिल्ह्यातील झरी येथून दरोडेखोराची आंतरजिल्हा टोळी जेरबंद केली आहे. आरोपीकडून २२ लाखांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. तसेच ३ दरोड्यासह ९ गुन्हेही उघडकीस आणले आहेत अशी माहिती



पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सेनगाव शहरातील एका सोन्याच्या दुकानाचा सुरक्षा रक्षकास मारहाण करून चोरट्यांनी दुकान फोडून दुकानातील सोने व चांदीचे दागिने लंपास करून पोबारा केला होता. या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवला होता. पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी पथके नेमण्यात आली होती. पथकाने घटनास्थळी भेट देऊन अत्यंत बारकाईने भौतिक व तांत्रीक पुराव्याचा सखोल अभ्यास करून अनेक सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यानंतर गोपनीय माहीतीच्या आधारे सदरचे गुन्हे हे रेकॉर्डवरील दरोडेखोर विरमंगलसिंग उर्फ डॉनसिंग मायासिंग दुधानी रा अंबरनाथ जि ठाणे ह. मु. झरी जि परभणी याने त्याच्या टोळीमार्फत केला आहे तसेच चोरलेला माल त्याची पत्नी व मुलगा सुरजितसिंग विरमंगलसिंग दुधानी यांचेकडे आहे. पथकाने आरोपीच्या राहत्या घरी छापा मारून पत्नी व मुलास ताब्यात घेतले. यावेळी आरोपींनी चोरी करण्यापूर्वी दुकानांची रेकी करीत डॉनसिंग यास माहीती दिल्याचे सांगितले. तसेच चोरी झाल्यानंतर मुद्देमालाची विल्हेवाट लावत असल्याचेही सांगितले. पथकाने आरोपींकडून २ तोळे सोने, ७५ तोळे चांदी, गुन्ह्यात वापरलेली स्कॉर्पिओ गाडी, एक बुलेट, एक होन्डा गाडी, मोबाईल असा २२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी विरमंगलसिंग उर्फ डॉनसिंग दुधानी, त्याची पत्नी, सुरजितसिंग दुधानी, अमरसिंग दुधानी, पंकजसिंग दुधानी यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला असून त्यांनी अंबरनाथ ठाणे व इतर ठिकाणी कट रचून चोर्या करीत असल्याची कबुली दिली. विरमंगलसिंग दुधानीवर २० पेक्षा जास्त गुन्हे दाखल असून मोक्का कायद्यान्वये केलेल्या कार्यवाहीतून जेल बाहेर आहे. तसेच विविध १० गुन्ह्यात शिक्षा सुध्दा लागली आहे.

सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पोनि विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, सपोनि दिपक मस्के, उपनि माधव जिव्हारे, उपनि दिलीप मोरे, उपनि रविकिरण खंडारे, अंमलदार भुजंग कोकरे, नितीन गोरे, संदीप जाधव, बालाजी मुंडे, ज्ञानेश्वर गोरे, धनंजय क्षीरसागर, आकाश टापरे, साईनाथ कंठे, हरिभाऊ गुंजकर, आजम प्यारेवाले, एकनाथ राठोड आदींनी बजावली आहे.

# देवगिरी बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, अध्यक्ष किशोर शितोळे यांच्याकडून प्रेझेंटेशनद्वारे वर्षभराची कामगिरी सादर

छत्रपती संभाजीनगर – देवगिरी नागरी सहकारी बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज उत्साहात पार पडली, यंदाची सभा बैंकेस नुकत्याच प्राप्त झालेल्या शेड्युल्ड बँकेचा दर्जा आणि इंटरनेट बँकिंगसाठी रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या मान्यतेमुळे विशेष ठरली.

बँकेचे अध्यक्ष मा. किशोर दादा शितोळे यांनी झझढ प्रेझेंटेशनच्या माध्यमातून बँकेची वर्षभरातील आर्थिक कामगिरी कर्जवाटप, डिजिटल उपक्रम व सामाजिक योगदानाचे सविस्तर विवरण सभासदांसमोर मांडले. ३१ मार्च २०२५ अखेर आपल्या बँकेचा एकुण व्यवसाय हा रु. २०४.०९ कोटीने वाढून रु.२४१९.८८ कोटी इतका झाला आहे. एकुण व्यवसायात बँकेने ९.२१% एवढी वाढ केली आहे. ठेवींमध्ये १०.७७% तर कर्जात ६.९०% एवढी वाढ झाली आहे. कर्ज ठेवीचे प्रमाण (सीडी रेशो) हा ६५% एवढा राखण्यात बँकेस यश मिळाले आहे. जे की कर्जवाढीतील चांगल्या मागणीचे आणि ठेवींच्या नियोजित संकलनाचे द्योतक आहे. बँकेचा निव्वळ नफा हा रु. ३९.२४ कोटी एवढा असून, बँकेने याही वर्षी विक्रमी नफा कमविण्याची परंपरा कायम राखली आहे.

तसेच देवगिरी बँकेस नुकताच रिझर्व्ह बँकेतर्फे शेड्युल्ड बँकेचा दर्जा मिळाला असून लवकरच



इंटरनेट बँकिंग सेवा ग्राहकांसाठी कार्यान्वित करून देण्यात येईल असे घोषित केले. सभासदांना सभा सुरू असतानाच १२% लाभांश देण्याचा ठराव पारित करून पुढील काही क्षणात सभासदांच्या खात्यात लाभांश जमा करत सुखद धक्का ही दिला.

सभेस महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन विकास व दिव्यांग कल्याण मंत्री मा. ना. श्री. अतुलजी सावे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी देवगिरी बँकेच्या प्रगतीचे कौतुक करत सहकार क्षेत्रात बँकेचे स्थान मजबूत होत चालल्याचे नमूद केले व बँकेस शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाल्याबद्दल संचालक मंडळांचे अभिनंदन केले,

बँकेचे सभासद व कर्मचारी यांच्या दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

या सभेस बँकेचे उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक शिवाजीराव शेरकर, अशोक पाटील, राजेश जैन, सजनराव मते, जयश्री किवळेकर, प्रशांत देशपांडे, नागनाथ काजळे, अॅड, सागर विद्रुंस, अॅड. मुकेश गोयनका, प्रा.डॉ क्षमादेवी खोब्रागडे, डॉ. प्रज्ञा तल्हार, मंगलताई वाहेगावकर, अमिता लेकुरवाळे, सुरेश जगाडे, सरदारसिंग बैनाडे, शुभदा वैद्य, अजिता पटेल यांची उपस्थिती होती. तसेच बँकेचे आजी माजी संचालक, शहरातील प्रतिष्ठित मान्यवर अनिलजी भालेराव,हरीशभाऊ कुलकर्णी,धनंजयजी धामणे, रमेशजी जाधव,राम भोगले, पी. यू. कुलकर्णी, माजी आमदार नितीन पाटील, दामूअण्णा नवपुते, बापू घडामोडे, देवजीभाई पटेल, संजय गायकवाड, राजूभाऊ बागडे, सन्माननीय सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी सूत्रसंचालन केले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी रुपेंद्र कोयाळकर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांच्यासह बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# न रडता लढणं हा गुण दिव्यांगांकडून घेण्यासारखा–आ.संदीप क्षीरसागर

## बीड येथे दिव्यांग व जेष्ठ नागरिक पूर्वतपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ जुलै**

शारिरीक व्यंगामुळे पावलोपावली संघर्ष असताना न रडता कायमस्वरूपी लढणं हा प्रेरणादायी गुण दिव्यांगांकडून घेऊन आयुष्यात अवलंबण्यासारखा आहे. असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले. बीड येथील दिव्यांग व जेष्ठ नागरिक पूर्वनोंदणी शिबीरात अध्यक्षीय समारोपात ते बोलत होते. यासोबतच बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड ग्रामीण आणि शिरूर कासार तालुक्यातील उर्वरित दिव्यांग बांधव व जेष्ठ नागरिकांनी पूर्वनोंदणी करून घेण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे.



जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग व अलिम्को संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या संकल्पनेतून दिव्यांग व्यक्तींना व जेष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य आणि साधने वाटपाच्या अनुषंगाने पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.संदीप क्षीरसागर होते. यावेळी बीड शहर आणि ग्रामीण भागातील दिव्यांग आणि जेष्ठ नागरिकांना कृत्रिम साहित्य आणि साधने मोफत वाटप करण्याच्या अनुषंगाने पूर्वनोंदणी करण्यात आली. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जाधव, जिल्हा समाजकल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे आदींसह दिव्यांग बांधव आणि जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंधेरीतील कांदळवनाच्या कत्तलीची तात्काळ दखल; अधिवेशन संपताच पंकजा मुंडे पोचल्या थेट पाहणीला

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.२१ जुलै**

अंधेरी पश्चिम येथील लोखंडवाला बॅक रोड परिसरातील कांदळवनाच्या कत्तलीप्रकरणी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी थेट जागेवर जाऊन पाहणी करत गंभीर स्थितीची नोंद घेतली. बेकायदेशीर भराव टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आणि संबंधित जागेवरील भराव हटवून मूळ कांदळवनाची पुन:स्थापना करण्याचेही आदेशही त्यांनी यावेळी दिले.

आमदार अनिल परब यांच्या लक्षवेधी सूचनेनंतर विधानभवनात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत अधिवेशन संपल्यावर दुसऱ्याच दिवशी पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे संबंधित घटनास्थळी पाहणीसाठी पोहोचल्या.सी.टी.एस. क्रमांक १६१, पहाडी गोरेगाव परिसरात झालेल्या पाहणीत आमदार श्री. परब, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (एमपीसीबी) सदस्य सचिव अविनाश ढाकणे आणि विविध खात्यांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बफर झोनमध्ये कोणतीही परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात भराव टाकल्याचे निदर्शनास आले. प्रत्यक्ष दर्शनी नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्याचे सांगून ही जागा काही वर्षांपूर्वी नॉन डेव्हलपमेंट झोनमध्ये होती.

# खड्डा झाला पालकमंत्री तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची पिलावळं

## नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यांना बारामती दाखवा – उल्हास गिराम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ जुलै**



बीड शहर मरणयातना भोगत आहे. उघडे रोहित्र, उघड्या नाल्या, सर्वत्र खड्डे, कचऱ्याचे ढिगारे, शहरवासियांच्या पिण्याच्या पाण्याचं नियोजन या सारख्या शेकडो समस्या म्हणजे शहरवासियासाठी मरणयातनाचं, पालकमंत्री म्हणून अजितदादा पवार आपण लक्ष घाला, बारामती जशी महाराष्ट्रासाठी आयडॉल आहे तसे बीड करा, बीड मध्ये नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यानां आपली बारामती दाखवा. दादा आपणाकडुन शहरवासियांच्या खुप अपेक्षा आहेत याला तडा जाऊ देऊ नका. आज शिवसैनिकांनी एका खड्ड्याचे नमकरण पालकमंत्री केले तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळं असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.आज बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस या मार्गांवर असणाऱ्या खड्ड्या संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलन निदर्शने करण्यात आली. या मार्गांवरील मुख्य खड्ड्याला पालकमंत्री खड्डा असे नाव देऊन खड्ड्याचे नामकरण करण्यात आले, तर बाकी छोटी – मोठी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळे असल्याचे शिवसैनिकांनी जाहीर केले. खड्ड्यात पालकमंत्र्याची प्रतिमा ठेऊन गुलाल बुक्का व हार घालून, ढोल तशे वाजवून जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लक्षावेधी आंदोनल केले.

# फार्मसी क्षेत्रात नवा मैलाचा दगड

## प्रा.डॉ.निखिल जाधव यांचे पुस्तक एम.फार्म विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२१ जुलै**

फार्मसी क्षेत्रात नवनवीन शैक्षणिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना दिशा देणारे गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे, विभाग प्रमुख प्रा. डॉ. निखिल जाधव यांनी एम.फार्मसी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त मॉडर्न ॲनालॅटिकल टेक्निक्स असे नवीन पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचे प्रथमदर्शी लोकार्पण गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष व प्रख्यात हृदयविकार तज्ञ डॉ. यशवंत राजेभोसले यांच्या हस्ते संपन्न झाले.



औषधनिर्माणशास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम. फार्मसी) विषयांमधील फार्मास्युटिकल नालिसिस हा विषय सर्व डिपार्टमेंट साठी कॉमन आहे त्याच बरोबर यात सिलॅबसवर आधारित भारतीय लेखकांचे फारच तुरळक व समजण्यास कठीण पुस्तके आहेत त्याचबरोबर यांतील संकल्पना गुंतागुंतीची आणि भाषा अवघड असल्यामुळे विद्यार्थी या विषयाकडे दुर्लक्ष करतात असे जाधव यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी हे पुस्तक 'फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाने' निर्देशित केलेल्या बी. फार्मसी अंतिम आणि एम.फार्मसी प्रथमवर्ष अभ्यासक्रमातील फार्मास्युटिकल नालिसिस विषयाशी निगडीत बनवले आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी सुलभ भाषेत आणि अभ्यासक्रमावर आधारित मार्गदर्शन करणारे असून त्यात सविस्तर आकृत्या व माहितीपूर्ण तक्ते दिलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या मनातील नालिसिस विषयाची भीती निघून जावी तसेच विद्यार्थी परीक्षेसह संशोधन आणि औद्योगिक क्षेत्रातही आत्मविश्वासाने पुढे जावेत, हा या पुस्तकामागील मुख्य उद्देश असल्याचे डॉ. निखिल जाधव यांनी सांगितले.

पुस्तकाच्या प्रकाशनावेळी बोलताना डॉ. यशवंत राजेभोसले म्हणाले, एम.फार्म विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन देणारे हे पुस्तक निश्चितच शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भर घालेल. या कार्यक्रमास गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्राचार्य अमित बिंदू, गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. मकेश बाबू उपस्थिती लाभली. या यशाबद्दल सर्व स्टाफने जाधव सरांचे अभिनंदन केले.

# श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## आई वडिलांची सेवा हिच खरी ईश्वर सेवा–ह.भ.प.प्रकाश महाराज साठे

**भा वृत्तसेवा**
**केज दि.२१ जुलै**

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अंखड हरिनाम सप्ताह व संत सावता महाराज जीवन चरित्र कथा वाचन सोहळ्याचे आयोजन दि.१६/०७/२०२५ ते दि. २३/०७/२०२५ या काळात करण्यात आले आहे.



याविषयी सविस्तर वृत्त असे की दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त येथील श्री संत सावता महाराज मंदिरात वैकुंठवासी ह.भ.प. रामकृष्ण महाराज वरपगावकर व वैकुंठवासी ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली महाराज उत्रेश्वर पिंप्रीकर यांच्या कृपा आशिर्वादाने व जेष्ठ नेते तथा सामाजिक कार्यकर्ते राम प्रभु राऊत (मेजर) व ह.भ.प. मृदंग अलंकार विलास महाराज कोरडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व संगीत विशारद ह.भ.प.सुमंत महाराज डाके व ह.भ.प. बाळु महाराज कोरडे, ह.भ. प.वैभव महाराज फुलझळके यांच्या सुमधुर गायनाने आणि ह.भ.प. मृदंग अलंकार विलास महाराज कोरडे यांच्या पखवाज वादनाने व श्री संत सावता यंग ग्रुप व गावातील तरुण मंडळींच्या सहकार्याने भव्य दिव्य अंखड हरिनाम सप्ताह व संत सावता माळी जीवन चरित्र वाचन सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांना मिळणार आहे.

दि. १६ जुलै रोजी महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे यांचे, व दि. १७ जुलै रोजी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. महादेव महाराज राऊत यांचे दि. १८ जुलै रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज रामानंद मठ संस्थान माजलगाव यांचे, दि. १९ जुलै रोजी ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांचे अमृततुल्य किर्तन संपन्न झाले व या किर्तनात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध पखवाज वादक ह.भ.प. भरत महाराज पठाडे यांची उपस्थिती होती.

यावेळी आपुलीया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ।।

या अभंगावर विवेचन करताना मानवी जिवनात आई वडिलांची सेवा हिच खरी ईश्वर सेवा व सर्व धर्म समभाव ही शिकवण आपल्या ढंगदार शैलीत विशद केली.दि. २० जुलै रोजी ह.भ.प.सुमंत महाराज डाके यांचे, किर्तन व याच दिवशी रात्री ९.३० ते १२.०० या वेळेत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भारुडकार ह.भ.प.गोविंद महाराज गायकवाड, आळंदीकर यांचा बहारदार सोंगी भारुडाचा कार्यक्रम होईल व दि. २१ जुलै रोजी ह.भ.प.प्रणितातई गवारे यांचे, तर दि. २२ जुलै रोजी ह.भ.प.कीर्तन केसरी ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे गेवराई यांचे, व दि.२३ जुलै रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प. महंत भगवान महाराज पुरी शिवरामपुरी मठ संस्थान, वरपगाव यांचे काल्याचे अमृत तुल्य कीर्तन होणार असून त्यानंतर भाविकांना महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहून भाविकांनी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक जेष्ठ नेते राम प्रभु राऊत मेजर, अभिजित राऊत, बाळु राऊत, यांच्यासह श्री. संत सावता यंग ग्रुप व तरुण मंडळ, व गावकरी यांनी केले आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नवनाथ अण्णा शिरोळे यांच्या हस्ते कापडी पिशव्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ जुलै**

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पर्यावरणपूरक व जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. गणेश लांडे यांच्या पुढाकाराने व संकल्पनेतून राबवलेल्या या उपक्रमात कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करून प्लास्टिक मुक्त बीड करण्याचा निर्धार करण्यात आला.



या उपक्रमाचे उद्घाटन नवनाथ अण्णा शिरोळे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाला बीड जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, अनिल चांदणे, राजू शहाणे, बाबूलाल डोरमारे, महादेव नागरगोजे, नरेश पवार, राजेश चरखा, बाबुराव परळकर, प्रितताई कुकडेजा, शेख अम्मू, शेख मामू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना गणेश लांडे यांनी सांगितले की, पंकजाताई मुंडे यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन सेवा पंधरवडा अंतर्गत हा उपक्रम राबवला आहे. प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे.नवनाथ अण्णा शिरोळे यांनी नागरिकांना मार्गदर्शन करत, पर्यावरणाची काळजी घेत प्लास्टिकच्या पर्यायांचा स्वीकार करा. कापडी पिशव्यांचा वापर हा छोटा बदल असला तरी भविष्यासाठी मोठा आहे, असे सांगितले.उपस्थित नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिकच्या घातक परिणामांची माहिती देण्यात आली. या उपक्रमाला बीडकरांनी चांगला प्रतिसाद दिला.सेवा पंधरवडा या उपक्रमांतर्गत राबवलेल्या या कार्यक्रमामुळे गणेश लांडे यांच्या पुढाकाराने बीड शहरात पर्यावरण संवर्धनाचा नवा संदेश दिला गेला आहे. प्लास्टिक मुक्तीच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले असून, पुढील काळात असे आणखी उपक्रम राबवले जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# पोलिसांकडून शिरूर कासार येथे जुगारावर छापा

## सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर दि.२१ जुलै**

शिरूर कासार पोलीस स्टेशन पोलीस पथकाने दिनांक २० जुलै २०२५ रोजी आर्वी शिवारात एका शेतात लिंबाच्या झाडाखाली सुरू असलेल्या तिरट जुगारावर छापा टाकत कारवाई केली आहे.पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पथकाने दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास आर्वी शिवारातील नमूद केलेल्या शेतात छापा मारला. या छाप्यात पोलिसांनी जुगार खेळणाऱ्या सहा इसमांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम ४,२९०/– रुपये आणि चार मोटरसायकल असा एकूण ३,२५,१३०/– रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी सर्व सहा आरोपींविरुद्ध शिरूर कासार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक २१३/२५ नुसार महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात आपली मोहीम यापुढेही सुरू ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, पोलीस हवालदार क्रमांक १५३० तुषार गायकवाड, पोलीस शिपाई क्रमांक २२२१ सतीश बहिरवाल आणि पोलीस शिपाई क्रमांक २२२९ सुनील बहिरवाल यांनी केली आहे.

# फसवणूक प्रकरणातील फरार आरोपीला अटक

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर दि.२१ जुलै**

शिरूर कासार पोलीस स्टेशनने गुन्हा क्रमांक १४८/२४, कलम ४०६, ४२० भा.दं.वि. अंतर्गत मागील एक वर्षापासून फरार असलेल्या आरोपी रवींद्र मनसुख बांदल, रा. कानोबाची वाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड याला अटक केली आहे.

तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा शोध घेऊन त्यास पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड येथील मोरे वस्ती, श्रीराम कॉलनी येथून ताब्यात घेतले. १९ जुलै २०२५ रोजी त्याला अटक करण्यात आली.आरोपीकडून गुन्ह्यात फसवणूक करून नेलेला एकूण ४९,०८८/– रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, ज्यात १३,६००/– रुपये रोख रक्कम, जिओ कंपनीचा वायफाय सेटअप आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू (किंमत ३५,४८८/– रुपये) यांचा समावेश आहे.सदर कारवाई श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली अधिकारी पोलीस हवालदार १२४५ बाळासाहेब सुरवसे आणि पोलीस हवालदार ७४३ राहुल नांगरे यांनी केली आहे.




# माजलगाव शहर भाजपाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२१ जुलै**

दिनांक.२२ जुलै मंगळवार रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस व २६ जुलै रोजी आपल्या सर्वांच्या नेत्या आदरणीय नामदार पंकजा मुंडे यांचा वाढदिवस आहे , या वाढदिवसानिमित्त कुठलीही बॅनरबाजी न करता सामाजिक उपक्रम राबवत हा वाढदिवस करावा असे आवाहन करण्यात आले आहे, आपण समाजाचं देणं लागतो व सामाजिक बांधिलकी जपणे हे आपले कर्तव्य आहे व याचाच एक भाग म्हणून दि. २२ जुलै मंगळवार रोजी सकाळी साडेनऊ वाजता गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले तरी आपण सर्व नागरिकांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन माजलगाव भाजपा शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे. भारतीय जनता पार्टीच्या दोन्ही नेत्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे माजलगाव शहर भाजपा पार्टीने ठरवले आहे. रक्तदान हे जीवनदान व श्रेष्ठ दान आहे. रक्तदान केल्यामुळे अनेक फायदे देखील आपल्या शरीरास होतात त्यामुळे रक्तदान हे एक महत्त्वाचे कार्य आहे ज्याद्वारे आपण गरजूंना जीवदान देऊ शकतो त्यामुळे त्यामुळे केवळ रुग्णांनाच नव्हे तर रक्तदात्यालाही अनेक आरोग्य विषयक फायदे मिळतात , नियमित रक्तदान केल्याने शरीरातील लोहाचे प्रमाण नियंत्रित राहते त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो रक्तदान केल्याने शरीरातील नवीन रक्तपेशी देखील तयार होतात त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि शरीर अधिक उत्साही वाटते, रक्तदान करताना काही प्रमाणात कॅलरी बर्न होतात त्यामुळे वजन कमी करन्यास देखील मदत होते आपल्या शरीरात होतात., आणि त्यामुळे आपण सर्वांनी रक्तदान नक्की करावे, व आपण रक्तदान केल्यामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो त्यामुळेच म्हणतात रक्तदान हे श्रेष्ठ दान, जीवनदान आहे व त्यामुळे हे रक्तदान शिबिर या वाढदिवसानिमित्त आयोजित केले आहे या रक्तदान शिबिरात सर्वांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे व रक्तदान करावे अशा प्रकारचे आवाहन माजलगाव शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.




# न्यायालयीन प्रशासनाचा 'जागृती युनिट' द्वारे जनसंपर्क; धारूरमध्ये महत्त्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२१ जुलै**

तालुका विधी सेवा समिती, धारूर यांच्या निर्देशानुसार धारूर येथे 'जागृती युनिट' ची स्थापना करण्यात आली आहे. या युनिटच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती देण्यासाठी तसेच भावी योजनांवर चर्चा करण्यासाठी शुक्रवार, दिनांक १८ जुलै २०२५ रोजी दुपारी २.१० वाजता दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर येथे एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला (एन.एम.वाली), दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, धारूर यांच्यासह अनेक प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यात तहसिलदार, धारूर; गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारूर; पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, धारूर/पिंपळदरा/सिरसाळा; सब पोस्ट मास्तर, डाक कार्यालय, धारूर; म.रा.म.पा.म. बीड विभाग, आगार कार्यालय, धारूर; ॲडव्होकेट संघ प्रतिनिधी; सर्व विधी दूत, तालुका विधी सेवा समिती, धारूर; शाखाधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा – बाजारपेठ/तेलगाव रोड; आणि किल्ले धारूर नगरपरिषद प्रतिनिधी यांचा समावेश होता.



बैठकीत 'जागृती युनिट' द्वारे करण्यात येणाऱ्या विविध कामांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक कार्यालयाने आपापल्या स्तरावर जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे यावेळी ठरविण्यात आले. याव्यतिरिक्त, आगामी १३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या लोक अदालतीविषयी माहिती देण्यात आली आणि नागरिकांना त्यांची प्रकरणे या लोक अदालतीमध्ये सामोपचाराने सोडवून घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या महत्त्वपूर्ण बैठकीला वकील संघाचे अध्यक्ष आणि मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते. (एन.एम. वाली), दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, धारूर यांनी 'जागृती युनिट' आणि लोक अदालतीसारख्या उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

# विजेची तार अंगावर कोसळून सोयगाव तालुक्यात तीन जनावरे ठार

## शेतकऱ्याचे दोन लाख चाळीस हजाराचे नुकसान

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२१ जुलै

दावणीला बांधलेल्या तीन जनावरांच्या अंगावर मुख्य विज तार कोसळून जनावरे विजेचा शॉक लागून ठार झाल्याची घटना सोमवारी सकाळी आठ वाजता घडली दरम्यान या प्रकरणी दुपारी दोन वाजता महसूल व महावितरणच्य पथकाने घटनेचा पंचनामा केला असून यामध्ये दोन बैल व गायीचा मृत झाले आहे दरम्यान या घटनेत शेतकऱ्याचे दोन लाख चाळीस हजार रु चे नुकसान झाल्याचे महसूलच्या पंचनाम्यात नमूद आहे दुपारी तीन वाजता पंचनाम्याचा अहवाल



जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आला आहे.जंगली कोठे शिवारात शेतकरी ज्ञानेश्वर सयाजी गोरे यांनी पहाटे आठ वाजता शेतातील झाडाखाली दावणीला दोन बैल व एक गाय बांधली दरम्यान या जनावरांना चारा पाणी करून शेतकरी घराकडे गेला असता,झाडावरून गेलेली जीर्ण झालेली मुख्य विजतार अचानक तुटून जनावरांच्या अंगावर कोसळून या घटनेत तीनही जनावरांचा जागीच मृत्यू झाला दरम्यान घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ग्रामस्थांनी धाव घेतली घटनेची माहिती शेतकरी ज्ञानेश्वर गोरे यांनी प्रशासनाला दिली या घटनेची परिसरात हळहळ व्यक्त होत होती दरम्यान घटनास्थळी पशुसंवर्धन विभागाने शवविच्छेदन करून अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.ऐन खरिपाच्या हंगामात शेतकरी ज्ञानेश्वर गोरे यांची दोन्हीही बैल ठार झाली आहे.दोन लाख रु बैलजोडी व चाळीस हजार रु गाय असे एकूण दोन लाख चाळीस हजार रु चे नुकसान झाले असल्याची माहिती महसूल विभागाने दिली आहे.

## शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना संभाजीनगर जिल्हा अध्यक्षपदी एकनाथ जाधव

बिडकीन दि २१ जुलै पैठण तालुक्यातील मावसगव्हाण येथील एकनाथ महाराज जाधव यांची शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे, त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले आहे, खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांनी नियुक्ती जाहीर केली, एकनाथ महाराज जाधव यांच्या निवडीचे रामेश्वर महाराज भवर, नारायण महाराज शिरवत, मधुकर महाजन जाधव, सरपंच अशोक धर्मे, ग्रामपंचायत सदस्य किरण गुजर,सागर फरताळे, रमेश शिंदे, मधुकर सोकटकर,ज्ञानेश्वर कांबळे, मोहन हिवाळे, राहुल ठाणगे, किसानलाल तोतला, नंदकुमार वैद्य, राजू वैद्य, माजी सरपंच ओमप्रकाश जैस्वाल,कांता डोळस,आदींनी अभिनंदन केले.



## आडगांव बुद्रुक येथे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिर संपन्न

### शिबिरात ४५७ हून अधिक रुग्णांची तपासणी




छत्रपती संभाजीनगर –

इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे आओ गांव चलें या उपक्रमांतर्गत रविवार, दिनांक २० जुलै २०२५ रोजी आडगांव बुद्रुक येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

IMA ने केवळ एका दिवसात आरोग्य तपासणी न करता, शिबिराआधी दोन दिवसांपासूनच नियोजन सुरू करून रुग्णसेवेची प्रभावी आखणी केली. शिबिराआधी दोन दिवसांपूर्वी गावातील १०० रुग्णांचे रक्तनमुने तपासण्यात आले. शिबिराच्या एक दिवस आधी IMA च्या डॉक्टर्स टीमने गावात भेट देऊन आरोग्य जनजागृती केली, तसेच शिबिरात भाग घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने केली. प्रमुख पाहुणे म्हणून मा. आमदार अनुराधा ताई चव्हाण यांची उपस्थिती लाभली. अध्यक्ष डॉ अनुपम टाकळकर यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिरात ४५७ हून अधिक रुग्णांची तपासणी विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

## सोशल मीडिया शहराध्यक्षपदी गुप्ता



पैठण दि २१ :- पैठण शहरातील भाजपा सोशल मीडियातील निष्ठावान कार्यकर्ते निखिल गुप्ता यांची पैठण शहर सोशल मीडिया शहराध्यक्ष पदी नुकतीच निवड करण्यात आली. नगराध्यक्ष सुरज लोळगे, लक्ष्मण औटे, प्रदेश सदस्य रेखाताई कुलकर्णी,मंडळ बंडू आंधळे, उपाध्यक्ष सुरेश गायकवाड, सतिश आहेर , देविदास शेळके,शरद बिडकर, रमेश पाठक, सुरेश मानधने, आशिष मापारी विशाल पोहेकर, वैभव पोहेकर, आकाश कुळथे,संदिप तुजारे, किरण दहिवाळ, ज्ञानेश्वर दहिवाळ, कैलास बरकसे,विशाल पहिलवान,रुशि पाचनकर,सनिल वीर, गणेश डुकरे,गणेश बांगर,रशिद कुरेशी,विजय आचार्य, जगदीश वीर,सुरज घुले आदींनी गुप्ता यांचे अभिनंदन केले.

## एमजी एम९ – भारतातील प्रेसिडेंशियल लिमोझिन लाँच

पुणे: जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने एमजी सिलेक्ट (लक्झरी ब्रँड चॅनेल) द्वारे एमजी एम९ – द प्रेसिडेंशियल लिमोझिन लाँच केली आहे. ही कार त्यांच्यासाठी आहे ज्यांना सुंदरता आणि नाविन्य आवडते. ६९.९० लाख (एक्स–शोरूम) या सुरुवातीच्या किमतीत लाँच केलेली, एम ९ भारतीय रस्त्यांवर अंतिम लक्झरी आणि एक्सक्लुझिव्हिटीचे नवीन बेंचमार्क स्थापित करते. बुकिंगसाठी, १,००,००० ची बुकिंग रक्कम देऊन जवळच्या एमजी सिलेक्ट एक्सपिरीयन्स सेंटरला भेट देऊ शकतात. डिलिव्हरी १० ऑगस्ट २०२५ पासून सुरू होईल.जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक अनुराग मेहरोत्रा म्हणतात, एमजी एम९ ही एका नवीन युगाची सुरुवात आहे, जी भारतातील लक्झरी आणि शाश्वत नवोपक्रमाची वाढती मागणी प्रतिबिंबित करते. ही प्रतिष्ठा आणि तांत्रिक श्रेष्ठतेचे प्रतीक आहे, ज्यामध्ये आधुनिक डिझाइन, उत्कृष्ट इलेक्ट्रिक कामगिरी आणि भारताच्या उदयोन्मुख आकांक्षांना अनुरूप अशी अंतिम वैशिष्ट्ये एकत्रित केली आहेत.

## उत्तम आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी 'स्मार्ट' टाकी लाँच

छत्रपती संभाजीनगर : भारताची अग्रगण्य आणि विश्वसनीयपाणीसाठवण उत्पादक कंपनी, वेलस्पन वर्ल्डचा भाग असलेली सिंटेक्समहाराष्ट्रात घेऊन आली आहे एक नाविन्यपूर्ण सिंटेक्स 'स्मार्ट' टाकी, जी १००% फूड ग्रेड व्हर्जिन प्लास्टिकपासून बनवलेली ही टाकी, आता आरोग्य आणि स्वच्छतेस प्राधान्य देणाऱ्या प्रत्येक भारतीय कुटुंबासाठी एक स्मार्ट निवड ठरत आहे. भारतीय कुटुंबांची किफायतशीर गरज ओळखून, सिंटेक्स ने 'स्मार्ट' टाकी अत्यंत परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून दिली आहे, जेणेकरून उच्च दर्जाचे पाणीसाठवणूक उपायमहाराष्ट्रातील प्रत्येक घरापर्यंत सहज पोहोचू शकेल बाजारात जरी स्वस्त दरात अनेक प्लास्टिकच्या टाक्या उपलब्ध असल्या, तरी त्यापैकी बहुतेक टाक्या रिसायकल्ड प्लास्टिकपासून बनवलेल्या असतात, ज्या पाण्याच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करू शकतात आणि आरोग्यावरही परिणाम करू शकतात.

## स्मिरनॉफ तर्फे भारतीय चवींच्या तीन नवीन स्वादांची सुरुवात

नाशिक : आता भारतीय स्वादांच्या क्षितीजात तीन नवीन प्रकार सुरु केल्याची घोषणा स्मिरनॉफ या व्होडकाच्या जगभरांतील पहिल्या क्रमांकाच्या ब्रॅन्ड तर्फे केली असून मिंटी जामून, मिरची मँगो आणि झिस्टी लाईम असे हे स्वाद आहेत. हे स्वाद विशेषकरुन आधुनिक भारतीय ग्राहकांसाठी तयार करण्यात आले आहेत. हरियाणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रात ही सुरुवात करण्यात येत असून ही नवीन उत्पादने राज्यांतील नवीन पिढीतील पिणा-यांच्या सांस्कृतिक उर्जा, वैविध्य आणि साहसाच्या उद्देशाने तयार करण्यात आलेली आहेत. एकीकडे पारंपारिक मेळाव्यांपासून सामाजिक कार्यक्रम कॅज्युअल हाऊस पार्ट्या, रूफटॉप मीटअप आणि थर्ड स्पेस हँगआउट्सकडे वळत असताना, भारताचे जनरेशन झी आणि तरुण मिलेनियल्स आपण ग्लास कसा आणि का वाढवायचा यांच्या नियमांचे पुर्नलेखन करत आहेत. त्यांच्या चवींचे प्रयोग ते करत असतात आणि तरीही ते जागतिक स्वादांमध्ये ही स्थानिक चव शोधत असतात. वाढती कॉकटेल संस्कृती विशेषकरुन घरात मोठे बदल घडल्याने तरुण प्रेक्षक हे सोपेपणा, भविष्यकालीन स्वादांसह इन्स्टाग्राम साठी योग्य अनुभव आणि व्हाईब्स निर्माण करत आहेत.

## आ. अब्दुल सत्तार यांच्या सुचनेने निराधार योजनेची बैठक संपन्न

### संजय गांधी निराधार योजनेच्या १६७ तर श्रावणबाळ सेवा योजनेच्या २८७ संचिकाना मंजुरी

सिल्लोड (प्रतिनिधी) दि.५, सिल्लोड - सोयगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांच्या निर्देशाने सिल्लोड येथे तहसिल कार्यालयात निराधार योजनेची बैठक संपन्न झाली असून या बैठकीत संजय गांधी निराधार योजनेसाठी १६७ तर श्रावण बाळ योजनेसाठी २८७ असे एकूण ४५४ पात्र संचिकांना मंजुरी देण्यात देण्यात आली आहे.

आमदार अब्दुल सत्तार यांच्या निर्देशाने नियमितपणे निराधार योजनेसंबंधी बैठक होत असल्याने पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळत आहे. वयोवृद्ध व निराधार पात्र लाभार्थ्यांना दरमहा १ हजार ५०० रुपये मानधन मिळत असल्याने त्यांच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी मोठी मदत होत आहे.

नियमाप्रमाणे निर्धारीत वेळेत निराधार योजनेसंबंधी बैठक घेण्याचे निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले असल्याने तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या शासकीय कमिटीच्या बैठकीत ऑनलाइन झालेल्या सर्व पात्र संचिका निकाली काढण्यात आल्या. यात एकून ७३ संचिकांमध्ये त्रुटी आढळून आल्याने त्यांना याबाबत माहिती देण्यात येणार असून संचिकेत त्रुटी असलेल्या नागरिकांनी त्रुटींची पूर्तता करावी जेणे करून येत्या बैठकीत पात्र संचिकाना मंजुरी देता येईल.

ज्यांच्या संचिका आवश्यक कागदपत्रे अभावी नामंजूर झाल्या आहेत त्यांनी सदरील पूर्तता करून द्यावी. यातील पात्र संचिका त्वरित निकाली काढण्यात येईल. निराधार योजनेसंबंधी नियमित बैठक होत असल्याने लवकरच पुन्हा बैठक होणार असल्याने निराधार योजनेचा लाभ घेण्यासाठी राहिलेल्या वयोवृद्ध व निराधार नागरिकांनी त्वरित तहसील कार्यालयात संचिका दाखल कराव्यात असे आवाहन आमदार अब्दुल सत्तार यांनी केले आहे.

## बुलढाणा अर्बन शाखा कन्नड च्या वतीने मयत कर्जदार सभासदाच्या वारसास आ. संजनाताई जाधव यांच्या हस्ते धनादेशाचे वितरण

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२१ जुलै

सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन सहकाराचे तत्व जनहिताला महत्व हे ब्रीद वाक्य घेऊन सहकारा सोबत सामाजिक बांधिलकीची जपणूक करणारी तसेच सदैव कार्यतत्पर असणाऱ्या बुलढाणा अर्बन संस्थेच्या शाखा कन्नडच्या वतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक,संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमलताई झंवर यांच्या प्रेरणेने व विभागीय व्यवस्थापक सिल्लोड संजय दळवी यांच्या



मार्गदर्शनाखाली कन्नड़ सोयगाव विधानसभा आमदार संजनाताई जाधव व स्थानिक सल्लागार यांच्या उपस्थितीत वारसदारास विमा धनादेश देण्यात आला शाखा कन्नड येथील सभासद येथील सभासद सोनेतारण कर्जदार स्वर्गवासी सक्रू रामचंद्र राठोड यांचे दि.९/२/२०२५ रोजी मोटार सायकल अपघातात झाला असता दुर्दैवी मृत्यू झाला. सदर घटनेची माहिती मिळताच शाखा व्यवस्थापक संजय वराडे यांनी राठोड कुटुंबाची सांत्वन भेट घेतली व संस्थेच्या वतीने देण्यात येणारा विमा योजनेची माहिती राठोड कुटुंबांना दिली व सदर प्रस्ताव मंजूर होऊन आल्यानंतर बुलढाणा अर्बन च्या शाखा कार्यालय कन्नड येथे एक छोटेखानी कार्यक्रमात स्व.सक्रू राठोड यांचे वारसदार उमेश सक्रू राठोड यांना विम्याचा धनादेश कन्नड-सोयगाव विधानसभा आमदार संजनाताई जाधव यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.यावेळी संचालक प्रकाश अग्रवाल,संतोष कोल्हे,राजकुमार भारुका,शैलेश ओम, प्रकाश भारुका,चेतन अशोक पांडे,अंकलेश्वर भारुका, संजय भारुका,आनंद पांडे,अशोक चव्हाण,संदेश भारुका, शेख शफीक पशू,अशोक पीरथानी,विजय अग्रवाल,सुरेश चव्हाण,आदींची उपस्थिती लाभली सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाखा व्यवस्थापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आ.अब्दुल सत्तार यांच्याहस्ते शासकीय मदतीच्या धनादेशाचे वितरण

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२१ जुलै

तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते शासकीय मदतीच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले.शनिवारी दि.१९ रोजी सोयगाव येथे शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात तालुक्यातील मोलखेडा,जरंडी,जामठी आणि घाणेगाव येथील पीडित चार कुटुंबांना प्रत्येकी १ लाख याप्रमाणे ४ लाख रुपयांच्या धनादेशाचे वितरण करण्यात



आले.तालुक्यातील भारत शेषराव लवटे गलवाडा, रवींद्र गोविंदा काळे मोलखेडा,राजेंद्र मोतीराम घनगाव जरंडी,संतोष सुरा जाधव जामठी या शेतकऱ्यांनी सततची नापिकी व कर्जबाजारी पणाला कंटाळून आत्महत्या केली होती. दरम्यान आमदार अब्दुल सत्तार यांनी सदरच्या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या घरी सांत्वन भेट देत पीडित कुटुंबाला शासकीय मदत मिळवून देवू अशी ग्वाही दिली होती.आमदार अब्दुल सत्तार यांनी याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्याअनुषंगाने सोयगाव येथे सदरील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी एक लाख याप्रमाणे एकूण ४ लाख रुपयांच्या शासकीय मदतीचे धनादेश आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते वितरण करण्यात आले.याप्रसंगी राजेंद्र राठोड,प्रभाकर काळे, गोपीचंद जाधव,दारासिंग चव्हाण,धरमसिंग चव्हाण,नायब तहसिलदार संभाजी देशमुख,नायब तहसिलदार काकासाहेब साळवे (पुरवठा),विजय उमाळकर महसूल सहाय्यक आदींची उपस्थिती होती.

## भक्तांबर प्रभावना चातुर्मास २०२५ ची कार्यकारणी जाहीर

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आचार्य प्रणासागरजी महाराज यांचा २०२५ चा चातुर्मास मोठया उत्साहाने सुरै असुन पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा, विश्वस्थ अरैण पाटणी, महावीर ठोले, ललीत पाटणी, जितेद्र पाटणी, यतीन ठोले, किरण पहाडे , संतोष सेठी, चंदा कासलीवाल, निता ठोले, यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तांबर प्रभावना चातुर्मास समिती २०२५ ची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष पदी – ॲड.अनिल कासलीवाल, महामंत्री पदी – प्रमोद पांडे, कार्याध्यक्ष पदी – संजय पहाडे, कोषाध्यक्ष पदी – ॲड.सुनिल काला, निखील गंगवाल, संयोजक – अशोक गंगवाल, अनुप पाटणी, सहसंयोजक – निलेश पाटणी, आशिष सेठी, रवि सेठी, सहमंत्री – प्रसाद पाटणी, दिनेश ठोले



पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी | अध्यक्ष ॲड.अनिल कासलीवाल | महामंत्री प्रमोद पांडे | कार्याध्यक्ष संजय पहाडे | कोषाध्यक्ष ॲड.सुनिल काला | कोषाध्यक्ष निखील गंगवाल | संयोजक अशोक गंगवाल | संयोजक अनुप पाटणी | सहसंयोजक निलेश (पिंटु) पाटणी | सहसंयोजक आशिष सेठी | सहसंयोजक रवि सेठी | सहमंत्री प्रसाद पाटणी | सहमंत्री दिनेश टोले

यांची एकमताने निवड करण्यात आली.तसेच स्वागताध्यपदी विभागीय आयूक्त जीतेंद्र पापळकर सकल जैन समाज अध्यक्ष राजेंद्र दर्डा कीशोर चंदुकाका सराफ डी बी कासलीवाल न्या कैलासचद चादीवाल मानीकचद गगवाल प्रमोदजैन डॉ प्रकाश पापडीवाल सजय पापडीवाल सूनील सुदरलाल पाटनी गुरू सेवा समीती विपीन पाडे शैलेश चादीवाल काजू कासलीवाल रीतेश ठोले शातीलाल पाटनी महावीर पाटनी मोहीत पहाडे श्रीपाल लोहाडे सतोश बाकलीवाल राजाभाऊ पहाडे मयूर ठोले शैलेश पहाडे सगीता सेठी सूरेखा पाटनी सपना पापडीवाल मोसमी सोनी शलाका पाटनी काशमीरा लोहाडे कनक ठोले शोभा लोहाडे काता पहाडे वैशाली पहाडे आदींची गूरूसेवा समिती पदी निवड केली तर प्रचार प्रसार पदी नरेंद्र अजमेरा,मनोज छाबडा, मनोज पाटणी, राजेद्र अजमेरा, पियुष कासलीवाल महावीर कासलीवाल निवड करण्यात आली.

तसेच यामध्ये चौका समिती गुरै सेवा समिती, आवास निवास समिती, स्वागत समिती वैदयकीय समिती, महाप्रसाद समिती, विधान पुजन समिती आदी समितीचे गठन करण्यात आले. नुतन समितीला सकल जैन समाजाच्या वतीने अभिनंदन करतण्यात आले.

## खरेदी-विक्री संघाच्या सभापती ज्ञानेश्वर निकम; उपसभापती भगवान कांदे



तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२१ जुलै - तालुक्यात अत्यंत चुरशीची झालेल्या कन्नड खरेदी-विक्री संघाची निवडणूक गेल्या दोन महिन्यापासून कधी नव्हत इतकी चर्चेला आली होती कारण आमदार संजना जाधव यांच्या एकटीच्या पॅनलच्या विरोधात तालुक्यातील सर्व पक्षाचे मातब्बर मंडळी एकत्र आले होते मात्र त्यावर मात करत आमदार जाधव यांच्या शिवशाही पॅनलचे सर्वच्या सर्व १५ उमेदवार विजयी होऊन सोमवार (२१ जुलै) रोजी १२:३० वा . निवडणूक घेण्यात येऊन सभापती पदी ज्ञानेश्वर निकम तर उपसभापती भगवान कांदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. आमदार संजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन वरील निर्णय घेण्यात आला. यावेळी रंगनाथ आल्हाड,राजकुमार गंगावाल,रामेश्वर घनकर,आकाशबोलधने ,प्रविणराठोड, अब्दुल वहाब,निरंजन चव्हाण, अप्पासाहेब जाधव,मिनाबाई निकम,सुनिता मालोदे प्रताप गुजर,प्रकाश राजपुत,लक्ष्मण साठे,निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन सहाय्यक निबंधक विनय धोटे, सहाय्यक निर्णय अधिकारी सुनिल कासतोडे, मतदान केंद्र अध्यक्ष पी.आर.जगरवाल, के.एस.चव्हाण, डि.आर. केदारे मतदान अधिकारी टि. बी.काळे हे उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २१८/२०२५.

१. लताबाई अनिल मोरे, वय ४७ वर्षे, धंदा मजुरी, रा. नारळीबाग सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. अमोल अनिल मोरे, वय २३ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे. ३. गोपाल अनिल मोरे, वय २४ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत अनिल रामा मोरे यांचा दिनांक ०१/०८/२०२२ रोजी सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत अनिल रामा मोरे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २१/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता २६/८/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

## जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया, मॅडम सहदिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. ३६६/२०२५ — पुढील तारीख १०/९/२०२५

अर्जदार – १– धनंजय पि. रमेश ऊर्फ रमेशराव भोसले, वय– २९ वर्ष, धंदा– शेती, रा. सरस्वती कॉलनी, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २– अनिता रामेश्वर जाधव, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. दादावाडी जालना, ता. जि. जालना. ३– सविता महेश जगताप, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. करंजगाव, पो. तळेगाव, ता. चाळीसगाव जि. जळगाव. ४– वनिता जयदिप देशमुख, वय ३२ वर्षे, धंदा– घरकाम, रा. दुसरबीड ता. सिदखेड राजा, जि. बुलढाणा. ५– मिनाबाई भ्र. रमेश ऊर्फ रमेशराव भोसले, वय–८८ वर्षे, धंदा– शेती, रा. सरस्वती कॉलनी कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैर अर्जदार :–निरंक

अर्जः– वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ व्ही. के. मोहिते यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. २ ते ४ यांचा भाऊ असुन अर्जदार क्र. २ ते ४ हया सख्या बहीनी आहे तसेच अर्जदार क्र. ५ ही अर्जदार क्र. १ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ५ यांचे पती नामे रमेश उत्तमराव भोसले हे होते ते दिनांक २६/०५/२०२५ रोजी मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ ते ४ यांचे आजोबा अर्जदार क्र. ५ यांचे सासरे म्हणजे मयत रमेश भोसले यांचे वडील नामे उत्तमराव बाळासाहेब भोसले हे दिनांक ०६/१२/२००३ रोजी मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आजी अर्जदार क्र. ५ यांच्या सासु म्हणजेच मयत रमेश भोसले यांच्या आई व मयत बाळासाहेब भोसले यांच्या पत्नी नामे लिलाबाई उत्तमराव भोसले या देखील दिनांक १७/१२/२०२२ रोजी मयत झालेल्या आहे, अर्जदार यांना रमेश उत्तमराव भोसले यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल, नगर परिषद कन्नड, तसेच महानगर पालीका कार्यालय येथे मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे दिनांक ११/०७/२०२५ रोजी तोंडी सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक २१/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

## ज्यांचा कोणाचा याच्याशी संबंध असेल त्यांना

याद्वारे सूचना देण्यात येते की हॅथवे एमसीएन प्रायव्हेट लिमिटेड (कंपनी) द्वारे जारी केलेले खालील शेअर सर्टिफिकेट, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय ३१०/३११, अक्षयदीप प्लाझाटाउन सेंटर, सिडको जालना रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र ४३१००१ येथे आहे, खालील भागधारकांच्या नावावर त्यांनी हरवले/गहाळ झाले आहेत आणि खालील शेअर सर्टिफिकेटने त्याऐवजी डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

| नोंदणीकृत भागधारकाचे नाव | फोलिओ क्रमांक | प्रमाणपत्र क्रमांक | विशिष्ट क्रमांक | | शेअर्सची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | |
| श्री. रणजीत मुळये | २ | २ | ५००१ | ९८७५ | ४,८७५ |
| | | १३ | १४४४११९ | १५८८२३५ | १,४४,११७ |
| | | १६ | १६९८४८६ | १८०६४८५ | १,०८,००० |
| | | २० | १८२६६११ | १८३१६१० | ५,००० |
| गंगामाई इंडस्ट्रीज ॲंड कन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट मर्यादित | ४ | ०४ | ६५००१ | १६०००० | ९५,००० |
| | | ०५ | १६०००१ | २५०००० | ९०,००० |
| | | १४ | १५८८२३६ | १५९०४८५ | २,२५० |
| | | १९ | १८१३२३६ | १८२६६१० | १३,३७५ |

वरील शेअर्सच्या संदर्भात कोणताही दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीने कंपनी किंवा तिच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट – केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ आणि ३२, गाचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद ५०० ०३२ यांच्याकडे ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा दाखल करावा, अन्यथा कंपनी त्या शेअर्सच्या संदर्भात डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करेल आणि त्यानंतर कंपनीकडून पुढील कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही.

संचालक मंडळाच्या वतीने आणि त्यांच्याकडून अनुक्रमे
हॅथवे एमसीएन प्रायव्हेट लिमिटेड
स्वाक्षरीत/–
रितेश वखारिया संचालक

दिनांक: २२ जुलै २०२५

## अग्रलेख...

# विद्यार्थ्यांना मिळणार गीतेचे धडे

उत्तराखंड पाठोपाठ आता हरयाणा सरकारनेही शाळांमध्ये प्रार्थनेत भगवद्गीतेतील श्लोक म्हणणे अनिवार्य केले आहे. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्रावर उपदेश केला त्याकाळी कुठलाही धर्म, पंथ, जात-पात अस्तित्वात नव्हती. मनुष्याने जन्म घेतल्यानंतर त्याची कर्तव्ये कोणती आहेत हे कृष्णाने अर्जुनाला सांगितले. याचाच अर्थ भगवद्गीता ही या पृथ्वीतलावरील मानवाच्या कल्याणासाठी आहे. भारतीय शिक्षणात भारतीय परंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांचा समावेश असावा, शालेय जीवनातच चांगले आणि वाईट काय याचे ज्ञान मिळावे, एक परिपूर्ण मनुष्य घडावा जो पुढे समाज आणि देश घडवेल, या उद्देशाने उत्तराखंडपाठोपाठ हरयाणा सरकारनेही राज्यातील सर्व शाळांमध्ये श्रीमद्भगवद्गीतेचे श्लोक वाचन सकाळच्या प्रार्थनेत अनिवार्य केले आहे. सरकारी तसेच खाजगी शाळांमध्ये दररोज एका श्लोकाचे वाचन केले जाणार आहे. गीतेतून आपल्याला अध्यात्म जीवनाचे महत्त्व तर कळतेच पण मनुष्य नैतिक मूल्यांनी परिपूर्ण होतो, तसेच नेतृत्वक्षमताही विकसित होते. गीतेतील श्लोक संस्कृत भाषेत आहेत. सर्वसामान्यांना ते समजणे कठीण असले तरी आता प्रत्येक भाषेत गीतेवरील भाष्य उपलब्ध आहे. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांनी सर्वप्रथम गीतेतील श्लोकांची फोड करीत भगवान श्रीकृष्ण यांनी केलेला उपदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविला. ज्ञानेश्वरांनी अहल्यानगर जिल्ह्यातील नेवासे येथे ज्ञानेश्वरी लिहिली. त्याला भावार्थ दीपिका असे म्हणतात. करवीश्वराच्या मंदिरात गीतेवर ज्ञानोबारायांनी भाष्य केले आहे. नक्की लिखाण कुठे केले याविषयी मतेमतांतरे आहेत. गोदावरीच्या काठावरील पैठण या तीर्थक्षेत्री ज्ञानेश्वरी रचल्याचेही दावे केले जातात. या आध्यात्मिक ग्रंथात ३६८ ओव्या आहेत. गीता म्हणजे अध्यात्म, भक्ती, तत्त्वज्ञान, समर्पण आणि शौर्याचे दर्शन घडविणारा ग्रंथ होय. अर्थात मानवी जीवनाचे सार गीतेत सामावलेले आहे. पण, आपल्या भारतीयांचे झाले असे की, कस्तुरीमृग तू तुला न कळले, सुगंध शोधत जीवन सरले। चाहूल घे सुख कोठे दडले, तुझे आहे तुझपाशी, पर तुला ना कळले। या ओळी अभंग नाही. चारोळी किंवा कविता असावी. पण, यातील भावार्थ आपल्याशी सुसंगत आहे.

आपल्या अभ्यासक्रमात पाश्चात्त्य साहित्य आणि साहित्यिकांची भरमार आहे. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाला असलेली पुस्तके पाश्चात्त्य लेखक, कवी, साहित्यिकांनी भरलेले आहेत पण भारतीय साहित्यिकांना फारसे स्थान मिळालेले नाही. भारताकडे सर्वच प्रकारच्या ज्ञानाचा खजिना उपलब्ध आहे पण आपल्याला त्यापासून वंचित ठेवले गेले. भगवद्गीतेला फक्त हिंदू धर्माशी जोडले गेले. वास्तविक पाहता हा ग्रंथ सर्वांसाठी अनुकरणीय आहे. श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यातील संवाद असलेल्या या ग्रंथात १८ अध्याय आणि एकूण ७०० श्लोक आहेत. हजारो वर्षे झाली तरी गीतेचे महत्त्व संपलेले नाही. भारतीय तत्त्वज्ञान हे कालातीत आहे. आजही गीताज्ञान अमोघ, अनमोल आणि अमूल्य आहे. गीतेचे ज्ञान तरुणवयात नव्हे तर बालपणापासून मिळणे आवश्यक आहे. दुर्दैवाने आपल्या देशात निवृत्त झालेले किंवा वृद्धावस्थेला पोहचलेले अध्यात्माकडे वळतात. वास्तविक पाहता गीतेतील ज्ञान बाल्यावस्थेपासून शाळांमधून देणे गरजेचे आहे. दुर्दैवाने आज गीता म्हटले की तथाकथित धर्मनिरपेक्षवाद्यांच्या कपाळावर आठ्या पडतात. पण, या उपटसुंभांच्या हे गावी नसते की गीतेतून आपल्याला केवळी ईश्वरी नव्हे तर व्यावहारिक ज्ञानही मिळते. माझाच देव चांगला, केवळ माझीच आराधना करा, असे एकेश्वरवादाचे दर्शन आपल्याला भारतीय तत्त्वज्ञानात मिळत नाही. भारतीय जीवनदर्शन आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून अभ्यासक, संशोधक भारतात येत असतात पण भारतीयांना मात्र या ज्ञानापासून वंचित ठेवले आहे.

कर्म हा गीतेचा गाभा आहे. वासुदेवनंदन पार्थला उपदेश करताना पदोपदी त्याला त्याच्या कर्माची आठवण करून देत असतात.

**न हि कश्चित्क्षणमपति जातु तिष्ठत्यकर्मकृत्।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥**

हा श्लोक सर्वांसाठी लागू पडतो. अर्थात कोणताही मनुष्य कोणत्याही काळात कर्म केल्याशिवाय राहू शकत नाही. कारण, निसर्गाने मनुष्याला अशाप्रकारे घडविले आहे की तो कर्म करीत राहण्यास बाध्य आहे. हे कर्म कोणते करायचे हे मनुष्याने ठरवायचे असते. वर्तमान युग विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे असले तरी जीवनाचे खरे ज्ञान आपल्याला गीतेमधून मिळते. त्यामुळे मुलांवर बालपणापासूनच जर चांगले संस्कार झाले, चांगले-वाईट याची जाणीव झाली तर संपूर्ण समाजाची जडणघडण योग्यरीत्या होण्यास मदत होईल. राग, द्वेष, नकारात्मक भावना, भीती अशा भावनांमध्ये अडकलेल्या मनुष्याने कसे वर्तन करावे, याचे ज्ञान गीतेतून मिळते. महाभारताचा कालावधी हा पाच हजार वर्षांपूर्वीचा आहे. या काळात जगात सनातन धर्म आणि भारतीय संस्कृती वगळता अन्य एकाही संस्कृतीचा लवलेशही नव्हता. मनुष्य रानटी अवस्थेत जगत असताना भारतात एक समृद्ध संस्कृती नांदत होती जिचा पाया भगवद्गीता आहे. कर्म करताना कर्तव्याची जाणीव ठेवा आणि कर्तव्याचे पालन करताना मनाचे संतुलन ढळू न देता समता या मूल्याचा अंगीकार करावा, असा उपदेश भगवान श्रीकृष्णाने गीतेतून दिला आहे.

गीतेत अंधश्रद्धेला वाव नाही. त्यामुळे उत्तराखंड आणि हरयाणा सरकारने सर्वच शाळांमध्ये गीतेतील श्लोक म्हणणे अनिवार्य करण्याचा जो निर्णय घेतला त्याचे परिणाम चांगलेच होणार आहेत. प्रत्येक श्लोकातून आपल्याला ज्ञानप्राप्ती होते जे वर्तमान जीवनाशी सुसंगत ठरते. बालक, मुले म्हणजे मातीचा गोळा असतात. त्यांना जसे वातावरण मिळेल, जशी संगत आणि ज्या प्रकारचे ज्ञान मिळेल त्याच आधारावर त्यांची मानसिक जडणघडण होते. सनातन ही अखिल विश्वाच्या कल्याणाचा विचार करणारी संस्कृती आहे. बालवयापासून गीतेचे धडे मिळाल्यास त्यांच्यात या ग्रंथाविषयी उत्सुकता निर्माण होण्यास मदत होईल. याचनिमित्ताने घराघरांमध्ये गीता पोहचेल. कारण गीता मुक्तीचा संदेश देत नाही तर कर्म, भक्ती, युक्ती आणि शक्तीचा संदेश देते. आपल्या रक्ताचा नातेवाईक असला तरी कुठल्याही परिस्थितीत अधर्माची बाजू घेऊ नये, हे तत्त्वज्ञान भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे.

गीतेतील प्रत्येक श्लोक हा सिद्धांतापेक्षा कमी नाही. हे सिद्धांत मानवी जीवनाची मूल्ये, आपला व्यवहार, नेतृत्वक्षमता, भावनात्मक संतुलन साधण्यात मदत करते. गीता म्हणजे शाळेत शिकविण्याचा एक विषय नसून यामधील उपदेश आणि शिकवण आचरणात आणण्याचा विषय आहे. कारण गीतेतील ज्ञानाचा आधार हा मनोविज्ञान, तर्क, व्यवहार विज्ञान आणि नैतिक दर्शनावर आधारित आहे. सनातन, भागवत धर्माचे अंग असलेली गीतेतील ही मूल्ये कोणत्याही धर्मासाठी नसून मानवजातीच्या कल्याणासाठी आहेत. खरे तर या ज्ञानापासून आपल्याला वंचित ठेवण्यात आले आहे. उशिरा का होईना, शाळांमधून गीताश्लोक मुलांना शिकविण्याचा अत्यंत चांगला निर्णय हरयाणा आणि उत्तराखंड या भाजपाशासित राज्यांनी घेतला आहे. उत्तराखंडमध्ये श्लोकांचे केवळ पठन केले जाणार नाही तर आठवड्यातून एकदा त्यावर समीक्षा केली जाणार आहे. तसेच 'श्लोक ऑफ द वीक' ठरविण्यात येणार असून त्यावर चर्चा केली जाईल. शिक्षक सूचना फलकावर श्लोक लिहून त्यावर चर्चा घडविली जाणार आहे. विद्यार्थ्यांना श्लोकाचे महत्त्व समजावे हा त्यामागील उद्देश आहे. भारतीय संस्कृती आणि शिक्षणात परंपरागत ज्ञानाचा समावेश केल्याने विद्यार्थी आणि समाजाचाच फायदा होणार असल्याचा तर्क समर्थनार्थ दिला जात आहे, तर दुसऱ्या बाजूने धार्मिक शिक्षण थोपवीत असल्याचे आरोपही सुरू झाले आहेत. उत्तराखंडमधील पुष्करसिंग धामी आणि हरयाणातील नायबसिंग सैनी सरकारने घेतलेला हा निर्णय सनातनविरोधकांना नक्कीच आवडला नसेल. हिंदू धर्म आणि परंपरेला सातत्याने विरोध करणाऱ्या डाव्यांच्या पोटात खुपायला प्रारंभ झाला आहे. पण, सर्वच दिवस सारखे नसतात. ही तर सुरुवात आहे. विश्वगुरू होण्याच्या दिशेने पडलेले पाऊल आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# पावसाळी अधिवेशन आजपासून

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर! आजपासून सुरू होत असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात या दोन प्रमुख मुद्द्यांवर वादळी चर्चा होण्याचे संकेत आहेत. २१ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात आणखीही काही मुद्दे चर्चेला येणार असले तरी चर्चेचा केंद्रबिंदू ऑपरेशन सिंदूर राहील असे दिसते.

**पहलगाम हल्ला :** २२ एप्रिल रोजी पहलगामच्या बैसारण खोऱ्यात झालेला दहशतवादी हल्ला हा प्रामुख्याने राज्य सरकारच्या अपयशाचे उदाहरण मानला जातो. स्थानिक गुप्तचर माहिती गोळा करण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने राज्य सरकारची असते. गुप्तचर कार्यप्रणालीचा हा अघोषित नियम आहे. स्थानिक यंत्रणा, स्थानिक खबरे या माध्यमातून गुप्तचर संस्थांना माहिती मिळत असते. या आघाडीवर राज्यातील उमर अब्दुल्ला सरकार अपयशी ठरले. याशिवाय राज्यात पर्यटकांचे आगमन सुरू झाले असताना, पहलगाम हे पर्यटकाचे एक प्रमुख केंद्र आहे, हे सरकारला माहीत होते. त्याठिकाणी पर्यटकांची गर्दी होईल, राज्य सरकारने तेथे सुरक्षा जवानांची तैनाती केली पाहिजे हे राज्य प्रशासनाच्या लक्षात यावयास हवे होते. ते झाले नाही. याचा फायदा दहशतवाद्यांनी उचलला.

**आणि पलायन :** २६ हिंदू पर्यटकांची हत्या केल्यानंतर चार-पाचही अतिरेकी जंगलात पळून गेले. स्थानिक जंगलातील वाटा, आडवाटा, रस्ते , दऱ्या-खोरे या साऱ्याची माहिती केंद्रीय सुरक्षा दलांना असेल, अशी अपेक्षा करणे चूक होते. हेही काम राज्य पोलिस दलाचे होते. त्यातही राज्य सरकार अपयशी ठरले. वास्तविक दुसऱ्या कोणत्याही राज्यात अशी घटना घडली असती तर तेथील सरकार बरखास्त करून, तेथे राष्ट्रपती शासन लावले गेले असते. पण, जम्मू-काश्मीरची संवेदनशीलता लक्षात घेऊन केंद्र सरकारने असे कोणतेही टोकाचे पाऊल उचलले नाही हे योग्यच झाले. अन्यथा पाकिस्तानचे पुन्हा फावले असते. एक दहशतवादी हल्ला करून राज्यातील लोकनिर्वाचित सरकार उलथविता येते हे पाकिस्तानच्या लक्षात आले असते. भारत सरकारने संयमित भूमिका घेत राज्य सरकारच्या विरोधात कोणतीही कारवाई केली नाही, हे योग्य झाले.

**ऑपरेशन सिंदूर :** ऑपरेशन सिंदूरबाबत सरकारकडून सभागृहात एखादे निवेदन केले जाईल आणि विरोधी पक्ष याबाबत चर्चा -प्रश्न उपस्थित करतील असे दिसते.

**ट्रम्प यांची घोषणा :** अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी या युद्धविरामाची घोषणा का केली असा प्रश्न विरोधी पक्ष उपस्थित करतील असे कळते. सरकारकडून याबाबत नेमके उत्तर दिले जाईल असेही समजते. राष्ट्रपती ट्रम्प यांचा स्वभाव पाहता त्यांनी स्वतःच असा आगाऊपणा केला असावा असे म्हणता येईल. कारण, राष्ट्रपती ट्रम्प वारंवार जे दावे करीत आहेत, ते भारताने यापूर्वीच फेटाळले आहेत. भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष भडकण्याची चिन्हे होती. तो आण्विक संघर्षही असू शकत होता. म्हणून अमेरिकेने यात मध्यस्थी केली असा दावा अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स व परराष्ट्र मंत्री मार्क रुबियो यांनी केला आहे. तो भारताने वारंवार फेटाळून लावला आहे. अमेरिकेचे उपराष्ट्रपती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात दूरध्वनीवर चर्चा होत असताना आपण स्वत: त्या खोलीत उपस्थित होतो, असे महत्त्वाचे विधान परराष्ट्र मंत्री डॉ. जयशंकर यांनी केले आहे. या विधानाला महत्त्वाचा पुरावा मानले पाहिजे.

**सीमा न ओलांडता :** भारत-पाकिस्तान यांच्यात आजवर १९४८, १९६५, १९७१, १९९९, २०१९, अशी चार-पाच प्रमुख युद्धे झाली आहेत. पण, ऑपरेशन सिंदूर नावाने झालेल्या युद्धाचे वैशिष्ट्य म्हणजे- दोन्ही देशांनी आपापल्या सीमांमध्ये राहूनच हा संघर्ष केला. ना भारताचा एक जवान वा एक विमान पाकिस्तानी हद्दीत गेले, ना पाकिस्तानचा जवान वा विमान- भारतीय हद्दीत शिरले. दोन्ही देशांमध्ये चार दिवस झडलेला जोरदार संघर्ष सीमा रेषांच्या आत राहून झाला.

**अधिकृत युद्धबंदी नाही :** भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष चार दिवसानंतर थांबला असला तरी दोन्ही देशांमध्ये अधिकृतपणे युद्धबंदी वगैरे झालेली नाही. जे काही झाले आहे ते सारे मौखिक! युद्धबंदीच्या करारावर ज्याप्रमाणे सह्या वगैरे केल्या जातात ते अद्याप झालेले नाही.

**दोन वादग्रस्त विधाने :** ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने काही विमाने गमावली काय याबाबत सरकारने अधिकृतपणे काहीही सांगितले नसताना, सरसेनापती अनिल चौहान व इंडोनेशियातील भारतीय दूतावासातील एका नौदल अधिकाऱ्याने केलेले विधान या दोन बाबी वादग्रस्त ठरल्या. जनरल चौहान यांनी भारताने एक विमान गमावले असे एक विधान सिंगापूरमध्ये आयोजित 'शांग्रिला डायलॉग्ज' या कार्यक्रमात बोलताना केले होते. तर नौदल अधिकाऱ्याने इंडोनेशियात आयोजित कार्यक्रमात बोलताना अधिक गंभीर विधान केले. या दोन्ही अधिकाऱ्यांनी हे टाळले असते तर ते बरे झाले असते. कारण, भारत सरकारने अधिकृतपणे काहीही सांगितलेले नाही. अशा स्थितीत सैनिक अधिकाऱ्यांनी काही विधाने करीत, सरकारला अडचणीत आणले हे योग्य ठरले नाही.

**अत्याधुनिक युद्ध :** ऑपरेशन सिंदूरचा सारा तपशील अद्याप समोर आला नसला तरी, भारत-पाकिस्तान यांच्यात झालेले हे अत्याधुनिक युद्ध होते यात शंकाच नाही. यात 'इलेक्ट्रॉनिक वॉर फेअर' नावाच्या तंत्राचा प्रथमच वापर करण्यात आला असे समजते. यात 'इलेक्ट्रो मॅग्नेटिक स्प्रेक्ट्रम' हे आजवर ऐकिवात नसलेले शस्त्र वापरण्यात आले. याचा वापर दोन्ही देशांनी केला. बहुधा या एका कारणामुळे जगभरातील लष्करी अभ्यासकांसाठी ऑपरेशन सिंदूर महत्त्वाचे ठरणार आहे.

**ऑपरेशन मल्टी डोमेन :** ऑपरेशन सिंदूर व त्याच्या उत्तरात पाकिस्तानने केलेले ऑपरेशन बुनयान उल मरसूस यांच्या संदर्भात एक नवा शब्द वापरला जातो. ऑपरेशन मल्टी डोमेन! याचा अर्थ काय? लढाऊ विमानांचे रडार, आकाशात असलेली रडारयंत्रणा सज्ज विमाने, अवकाशातील उपग्रह अशा वेगवेगळ्या स्तरांवर हे युद्ध लढले गेले. येणाऱ्या काळातील युद्ध-'मल्टी डोमेन ऑपरेशन' राहणार असल्याचे मानले जाते.

**चर्चा बिहारची :** दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीचे नगारे वाजू लागले आहेत. बिहार विधानसभा निवडणूकीपूर्वी निवडणूक आयोगाने मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा निर्णय घेतला, जो वादग्रस्त ठरला. त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले.

**२८ जुलैला सुनावणी :** सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत निवडणूक आयोगाला तीन प्रश्न विचारण्यात आले. न्यायालयाने आयोगाला निवडणूक यादी सुधारित करण्याचा निर्णय तर स्वीकारला पण, आताच का, असा एक प्रश्न विचारला आहे. या संदर्भात न्यायालयाने कोणताही अंतिम आदेश जारी केला नसला तरी, पुढील सुनावणी २८ जुलै रोजी करण्याचा निर्णय घेतला आहे. या साऱ्याचे पडसाद संसदेच्या दोन्ही सभागृहांत उमटणार आहेत. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणूक २०२५ मधील शेवटची निवडणूक असेल. २०२६ च्या पहिल्या पूर्वार्धात प. बंगाल विधानसभेची निवडणूक होणार आहे.

**पाठिंबा आणि विरोध :** 'एक देश, एक निवडणूक' यावर विचार केला जात आहे. देशाचे माजी मुख्य न्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूड यांनी 'एक देश, एक निवडणूक' संकल्पनेला पाठिंबा तर दिला आहे. मात्र, निवडणूक आयोगाला अधिक अधिकार असण्यास जोरदार विरोध नोंदविला आहे. एक देश, एक निवडणूक संकल्पना किती वेगाने समोर सरकते हे येणाऱ्या काळात दिसेल.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# शब्दावाचून कळले सारे...

पत्रकारितेत म्हणतात की, एक छायाचित्र एका संपूर्ण बातमीचे काम करते. प्रतिमेचे कोणतेही रूप घ्या ते हजारो शब्दांचे काम करण्यास सक्षम असते. यासाठी भास या संस्कृत नाटककाराचे 'प्रतिमागृहप्रवेशम्' हे नाटक फारच बोलके आहे. वडिलांच्या मृत्यूबाबत अनभिज्ञ असणारा भरत जेव्हा आजोळहून परतत असतो तेव्हा त्याला मार्गात एक प्रतिमागृह दिसतं. तेथे रघुवंशातील दिवंगत राजांच्याच प्रतिमा असतात, असे त्याला सांगितले जाते. दर्शनासाठी तो आत जातो तेव्हा त्याला तिथे राजा दशरथाची प्रतिमा दिसते आणि तो मूर्च्छित होतो. एक प्रतिमा खूप काही सांगून जाते, याचेच हे द्योतक आहे.

हाच फंडा आपल्या मोबाईलमधील इमोजींनाही लागू पडतो. ज्या भावना मांडायच्या आहेत त्या शब्दात मांडण्यापेक्षा ते दर्शविणारी इमोजी टाकली की काम फत्ते... आपण एखाद्या गोष्टीवर हसतोय् म्हटल्यानंतर अगदी नाटकाच्या स्क्रिप्टमध्ये लिहितात तसे कंसात 'हशा' असे टाकायची गरज नाही, एक हसण्याचा इमोजी टाकला की काम भागतं. बरे त्या हसण्याचेही वेगवेगळे प्रकार इमोजी दाखवतं. स्मितहास्य, विकट हास्य, सात मजली हास्य, लोटपोट हास्य सारे काही प्रकार त्यात आहेत. तुम्ही कसे हसता ते तुमच्यावर अवलंबून आहे. दु:खाचेही तसेच आहे. दु:खाचे इमोजीही वेगवेगळ्या प्रकारात उपलब्ध आहेत. एखाद्या पोस्टविषयी सहृदयता दाखवायची असेल तर हृदयाचा इमोजीही आहे. विशेष म्हणजे, यात कोणीही हृदयाचा इमोजी टाकल्यावर प्रेम वगैरे व्यक्त केल्याचा गैरसमज करून घेत नाही. आता लोकांना या इमोजीची सवय झाली आहे. एरवी कोणाला साध्या पत्रात हृदयाच्या आकाराचे 'बदाम' पाठवले तर मार खाण्याचीच वेळ यावी...!

एकूणच काय तर इमोजीने माणसाचे व्यक्त होणे सोपे केले आहे. नुकताच या इमोजींचा वाढदिवस १७ जुलैला झाला. ११ वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या या इमोजींनी भावनाविष्काराला नवे रूप, नवे आयाम दिले. इमोजींचा जन्म १७ जुलै २०१४ रोजी झाला. ११ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या इमोजीची कहाणी मोठी गमतीशीर आहे. याची संकल्पना सर्वप्रथम जपानमध्ये अस्तित्वात आली. शिंगटाका कुरिता या दूरसंचार क्षेत्रात कार्यरत अभियंत्याने सर्वप्रथम १९९९ साली याची निर्मिती करत ते फोनमध्ये वापरले. जपानमध्ये ही कल्पना खूपच आवडली आणि त्याच्या अनेक आवृत्त्या बाजारात आल्या. मात्र, याला जगभराची मान्यता मिळण्यासाठी २०११ हे वर्ष उजाडावे लागले. जपानमध्ये जन्माला आलेल्या या संकल्पनेचे पालकत्व ऑस्ट्रेलियन जेरेमी बर्जने घेतले. त्याने विविध भावनांना मूर्त रूप दिले आणि काही वर्षातच तब्बल साडेसात हजारांपेक्षा जास्त भावनांना इमोजीच्या रूपात सांधले. मँचेस्टरमध्ये दहशतवादी हल्ला झाला तेव्हा दु:खी इमोजी लोकप्रिय झाला तर डोनाल्ड ट्रम्पच्या निर्णयाविरोधातील रागाचा इमोजीही समाज माध्यमांवर रुजला. त्यानंतर इंटरनेटच्या जगात इमोजीचा प्रवेश खऱ्या अर्थाने झाला. मोबाईलमध्ये २०१४ पासून इमोजींचे दालन खुले झाले.

जेरेमी बर्ज यांनी साकारलेले इमोजीचे जग इतके प्रभावी ठरले की त्याची दखल ॲपल, सॅमसंग, फेसबुक, गुगल या सर्व बड्या कंपन्यांना घ्यावीच लागली. आज हजारो इमोजी अस्तित्वात आहेत. मानवाच्या विविध भावभावनांना वाट मोकळी करून देताहेत. मात्र, ठेंगा, स्मितहास्य, खळाळून हास्य, अश्रू, हृदयाचा बदाम आणि चुंबन या इमोजींचा वापर सर्वाधिक प्रमाणात होतो, असे नुकतेच एका सर्वेक्षणातून समोर आले आहे. विशेष म्हणजे, दररोज जगभरात पाच अब्ज एवढ्या मोठ्या संख्येने इमोजींचा वापर होतो. आज आपण मोबाईलच्या आहारी गेल्याबद्दल खडे फोडतो. मात्र, मोबाईलने दूरच्या व्यक्तीसोबतही संवादाचा सांधलेला पूल आपण विसरून जातो. आज जवळच्या नातेवाईकांनी एकमेकांकडे जायला हवे, अगदी वेळात वेळ काढून जायला हवे, असे आपण आग्रहपूर्वक म्हणतो. पण, एकूणच सर्वांचा दिनक्रम बघता एका ग्रुपच्या माध्यमातून का होईना, सगळे बांधलेले असतात, हेही नसे थोडके. भावना या बोलूनच व्यक्त केल्या पाहिजे, हेही अगदी खरे आहे. मात्र, जेव्हा शब्द अपुरे पडतात तेव्हा एरवी अश्रू बोलतात, हे आपण अनुभवले. तसे आता शब्द सुचले नाही तर इमोजी मदतीला धावतात. इमोजीमुळे काय मिळाले आणि काय गमावले, हा व्यर्थ हिशेब मांडण्यापेक्षा अनेकांच्या अव्यक्त, अमूर्त भावनांना या इमोजींमुळे मूर्त रूप मिळाले, या क्रांतीचा जयजयकार करायला हवा. अर्थातच, त्याचा अतिवापर अयोग्यच आहे. ज्या नात्यांसाठी आपुलकीचे आपण बोललेले शब्द आणि भेट महत्त्वाची आहे तिथे ती गरज भागवलीच पाहिजे. मग बाकी जगात वापरायला हरकत नाही....नमस्कार, पुष्पगुच्छ, स्मितहास्य...!

७७५५९३८८२२


## कानोसा

अमोल पुसदकर

# जनसुरक्षा कायद्याची भेट

नुकतीच फडणवीस सरकारने महाराष्ट्राला जनसुरक्षा कायद्याची भेट दिलेली आहे. या कायद्याबद्दल बरेच गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न माओवादी लोकांनी, शहरी नक्षलवाद्यांनी आणि त्यांच्या द्वारा समर्थित राजकीय पक्षांनी केला. मागील वर्षी याबाबतचे विधेयक मांडण्यात आले होते. सरकारने मागच्या वर्षी बनविलेल्या सर्वपक्षीय समितीने जवळपास १२५०० सूचनांचा विचार करून व आवश्यक ते बदल करून हा कायदा सर्वांनुमते पारित केलेला आहे.

दहशतवादानंतर नक्षलवाद हा भारताला पोखरणारा एक मोठा रोग आहे. संपूर्ण देशभरामध्ये भोळ्याभाबड्या अशिक्षित जनतेला संविधानाच्या व सरकारच्या विरोधामध्ये भडकवून समाजामध्ये एक वर्ग संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात असतो. याला देशभरामध्ये चालविण्याचे कार्य वामपंथी, माओवादी विचारसरणीचे लोक करीत असतात. जंगलामध्ये आपल्या पोलिसांच्या आणि निमलष्करी दलाच्या विरोधात नक्षलवादी सशस्त्र संघर्ष करतात. गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वात संपूर्ण देशभरामध्ये सशस्त्र नक्षलवादाची कंबर तोडली गेलेली आहे. ठिकठिकाणी त्यांना शरणागती पत्करावी लागत आहे. सशस्त्र नक्षलवादाला जनता सुद्धा कंटाळलेली आहे. वर्षानुवर्षे जंगलात राहून, विकासापासून दूर राहून, वनांमध्ये राहणाऱ्या या सर्वसामान्य आदिवासी समाजाला सुद्धा आपल्या भविष्याची चिंता आता सतावत आहे. आपणही विकासाच्या प्रवाहामध्ये आले पाहिजे. आपल्याही मुलाबाळांचे भविष्य हे चांगले झाले पाहिजे. आपल्या डोक्यावर कधी नक्षलवाद्यांची तर कधी पोलिसांची कोणतीही टांगती तलवार राहू नये अशा पद्धतीचा विचार सर्वसामान्य वनवासी जनता करीत आहे. त्यामुळेच पोलिसांच्या, निमलष्करी दलांच्या मोहिमांना यश येऊन गडचिरोली असो की बिजापूर, बस्तर असो की तेलंगणा आंध्र प्रदेशचा भाग या सर्व ठिकाणी सशस्त्र नक्षलवाद पराभूत होताना दिसत आहे. सर्व सामान्य तरुणाचा या चळवळीने भ्रमनिरास केल्यामुळे तोही आता नोकरी धंद्याच्या व पोटापाण्याच्या कामाला लागलेला आहे. नवीन तरुणांची भरती सशस्त्र नक्षलवाद्यांमध्ये आता जवळपास बंदच झालेली आहे. जुने लोक सुद्धा सातत्याने जंगलात पळून कंटाळून ते सुद्धा हा मार्ग सोडून शरणागती पत्करत आहेत. हा सरकारचा व संविधानाचा एक प्रकारे विजयच आहे.



परंतु सरकारचे सशस्त्र नक्षलवादाविरोधात जे विजयी अभियान चालू आहे त्याला पराभूत करण्यासाठी शहरी नक्षलवादी सरसावलेले असतात. शहरी नक्षलवादी हे दिसायला तुमच्या आमच्या सारखेच असतात. हे सर्व लोक विशेषत: आदिवासी, मागासवर्गीय लोकांना किंवा मजुरांना हाताशी धरून सरकारविरोधी, संविधानविरोधी आंदोलन करताना दिसतात. त्यांच्याजवळ लेखक आहेत, कवी आहेत, राजकीय नेते सुद्धा आहेत, पत्रकार आहेत, इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये सुद्धा त्यांच्या लोकांचा वावर आहे. हे लोक स्वत: काही करीत नाही. परंतु सर्वसामान्य जनतेला भडकवून एखाद्या विशिष्ट गटाविरुद्ध, समाजाविरोधात किंवा सरकारी मालमत्तांच्या विरोधात हे लोक हिंसाचाराला प्रोत्साहन देत असतात. म्हणजे कधी मजुरांच्या, कधी शेतकऱ्यांच्या, कधी विद्यार्थ्यांच्या, कधी आदिवासींच्या तर कधी मागासवर्गीयांच्या खांद्यावर बंदूक ठेवून हे लोक समाजामध्ये हिंसाचार घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतात. समाज माध्यमांवर सुद्धा ये आजादी अधूरी है, ये आजादी झूठी है, आम्हाला आमचे राज्य आणायचे आहे अशा पद्धतीच्या गोष्टी हे लोक प्रचारीत करीत असतात. सर्वसामान्य समाजाला मात्र याबद्दल त्यांच्या हेतूबद्दल काहीही माहिती नसते. हे बिनबोभाटपणे सरकारी सर्व सोयी सुविधांचा वापर करीत समाजामध्ये राहूनच समाजाचे, देशाचे रक्त पिण्याचे काम करीत असतात. हे लोक ते अस्तनितले साप आहेत, हे लोक म्हणजे माणसाचे रक्त पिणाऱ्या अळ्या आहेत. अनेक वेळा गुप्तचर विभाग, पोलिस दल यांच्यावर व यांच्या कार्यावर नजर ठेवून असतात. परंतु बरेच वेळा हे पडद्यामागचे सूत्रधार असल्यामुळे यांना अटक कशी करायची हा नेहमी प्रश्न असतो. पोलिस दलाला अशा लोकांवर कारवाई करण्यासाठी केंद्र सरकारच्या ''बेकायदेशीर गतिविधि प्रतिबंधक कायद्याची'' मदत घ्यावी लागायची. परंतु केंद्र सरकारचा कायदा हा अधिक व्यापक असल्याने त्याचा वापर करण्यामध्ये स्थानिक स्तरावर अनेक अडचणी यायच्या. ज्यामध्ये पकडलेल्या आरोपींना सुद्धा सोडून द्यावे लागायचे किंवा न्यायालयात त्यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल करेपर्यंत फारसे पुरावे गोळा होऊ शकत नव्हते. छत्तीसगड, आंध्र, ओडिशा, तेलंगणा या राज्यांमध्ये अशा पद्धतीचे कायदे आधीच अमलात आलेले आहे. त्याच्या भरोशावर त्यांनी नक्षलवादाला चांगलाच लगाम घातलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या समस्यांवर नेमके लक्ष केंद्रित करणाऱ्या प्रभावी कायद्याची आवश्यकता होती. परंतु असा कायदा आणण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची सुद्धा आवश्यकता असते. यापूर्वीच्या कोणत्याही सरकारने अशा पद्धतीची इच्छाशक्ती दाखविली नव्हती हे तितकेच खरे आहे. या कायद्याद्वारे हिंसाचाराला प्रोत्साहन देणारा किंवा देऊ शकणाऱ्या व्यक्तीला पोलिस अटक करू शकतात. त्याच्यावरील आरोप हे दखलपात्र व अजामीनपात्र राहणार आहेत. त्यामुळे पोलिसांना अशा व्यक्तीला किंवा सूत्रधाराला अटक केल्यानंतर जवळपास कमाल बारा महिन्यांचा कालावधी मिळू शकतो. ज्यामध्ये पोलिस त्याची पाळेमुळे खोदून काढू शकतात व त्याच्याविरोधात दमदार आरोपपत्र तयार करू शकतात. या कायद्याचा दुरुपयोग होऊ नये यासाठी सरकारने एखाद्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करताना डीआयजी पदाच्या व्यक्तीची लेखी परवानगी घेणे बंधनकारक केले आहे. या गुन्ह्यांचा तपास हा उपअधीक्षक (डीवायएसपी) आणि त्यावरील अधिकारीच करू शकणार आहेत. एखाद्याला अटकेत आणखी काही दिवस ठेवायचे असेल तर निवृत्त न्यायाधीश किंवा न्यायाधीश ज्याचे सल्लागार आहे असे मंडळ स्थापन करावे लागेल व त्या मंडळाच्या परवानगीने त्यांच्यासमोर आवश्यक ते पुरावे सादर करूनच व्यक्तीला कमाल मर्यादेपर्यंत अटकेत ठेवता येऊ शकेल.

हा कायदा सर्वसामान्य माणसांचा सरकार विरोधी निदर्शने करण्याचा किंवा बोलण्याचा अधिकार काढून घेत नाही. समाज, संविधान, सरकार, सरकारी मालमत्ता यांच्या विरोधातल्या कृतींना बेकायदेशीर ठरवून समाजाचे नुकसान होऊ नये यासाठी त्वरित कारवाई करण्याचा अधिकार पोलिसांना देणारा हा कायदा आहे. शहरी नक्षलवादाचे कंबरडे मोडणारा हा कायदा आहे. ''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' हे आपले ब्रीदवाक्य आहे. त्यामुळे जनतेच्या सुरक्षेसाठी निर्माण करण्यात आलेल्या या जनसुरक्षा कायद्याचे आपण स्वागतच करायला पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## नेत्यांचे वर्तन योग्य आहे का?

आपला महाराष्ट्र संपूर्ण देशात एक शांत, पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जायचे, होय ओळखले जायचे. शौर्य आणि संस्कृतीचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमी, अनेक महान कवी, लेखक, कलाकार, वैज्ञानिक, शिक्षक, नेतेमंडळी आणि खेळाडू होऊन गेलेत. आणखी काय तर देशाची आर्थिक राजधानी सुद्धा! अशा आपल्या महाराष्ट्रात अलिकडे विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी, मंत्री आणि कार्यकर्ते यांचे वर्तन फारच अशोभनीय आहे. अगदी लज्जास्पद गोष्टी त्यांच्याकडून आपण अनुभवतो. निवडणुकीच्या वेळी नम्रतेने जनतेसमोर हात पसरणारे नंतर सरड्यासारखे रंग बदलतात. सामान्य माणसालाही ऐकायला व बघायला लाज वाटेल अशी त्यांची वक्तव्ये, शाब्दिक चिखलफेक, राडा, समाजात तेढ निर्माण करणे, नुकताच झालेला विधानभवनातला तुंबळ राडा तर कळसच!

विधिमंडळात असो वा व्यासपीठावर काहींचा व्यवहार आक्षेपार्ह असतो. कुठे आहेत ती सुसंस्कृत नेतेमंडळी जी विरोधी पक्षातील नेत्यांना सुद्धा सन्मानाने वागवायची. आजही काही नेत्यांकडे आपण एक आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून बघतो. नवनिर्वाचित नेते मंडळींना आमदार, खासदार, मंत्रिपदाची शपथ देण्यापूर्वी किमान शिष्टाचाराचे धडे द्यायला नको का? ही असली लबाड मंडळी काय जनतेची सेवा करणार? काय राज्याचे आणि देशाचे हित साधणार? तरुण पिढीने यांच्याकडून काय शिकायचे? समृद्ध महाराष्ट्रासाठी एकूणच संस्कृतीच्या दृष्टीने हे घातक आहे. या विघातक वर्तनाला वेळीच लगाम लावला पाहिजे अन्यथा ही वृत्ती नवीन पिढीच्या नेतेमंडळींपर्यंत झिरपेल आणि बेंचमार्क सुद्धा ठरेल. तेव्हा ज्येष्ठ नेत्यांना कळकळीची विनंती आहे की यावर विधिमंडळात चर्चा करून पायबंद घालण्यासाठी आवश्यक असेल तसे विधेयक सुद्धा आणावे. माजलेल्या आणि भ्रष्टाचारी नेत्यांना माघारी बोलावण्याचा जनतेला अधिकार असावा. जनतेच्या सहनशक्तीचा कडेलोट होऊन सैराट नेत्यांना सार्वजनिक चोप मिळण्यापूर्वीच यांच्या वागणुकीला चाप बसेल अशी व्यवस्था तरी निर्माण करावी हीच विनंती आणि अपेक्षा.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

## वाचक पत्रे

### दीप अमावास्येचे महत्त्व

आषाढ महिन्यातील अमावास्येच्या दिवशी दीप अमावास्या असते. दीपपूजन हे एक व्रत म्हणून साजरे केले जाते. या दिवशी दिव्यांचे भावपूर्ण पूजन केले जाते. भारतीय संस्कृतीमध्ये दिव्याला विशेष स्थान आहे. दिवा हा तेजाचे प्रतीक आहे. दिव्याचे वर्णन ''तमसो मा ज्योतिर्गमय'' असे केले जाते. दिवा हा आपल्याला अंधकाराकडून प्रकाशाकडे नेतो. तो स्वत: जळून मानवाला प्रेम, शांती, प्रकाश यांचा संदेश देतो. हीच त्याची महानता आहे. पूजेच्या उपकरणांमध्ये दीप किंवा दिवा मुख्य उपकरण आहे. दीपपूजनाच्या विधीमध्ये दिव्यासाठी एक संस्कृतमध्ये मंत्र आहे त्याचा अर्थ असा आहे की, हे दीपदेवता तुम्ही ब्रह्मस्वरूप आहात, तेज:पुंज आहात, तुम्ही कधीही क्षीण होत नाही. मला आरोग्य देऊन माझ्या सर्व इच्छा पूर्ण करा.

अग्निपुराणात असे सांगितले आहे की, पूजेसाठी वापरण्यात येणाऱ्या दिव्यामध्ये केवळ तेल किंवा तूप यांचाच वापर करावा. याशिवाय कुठल्याही ज्वलनशील पदार्थाचा उपयोग करू नये. अशाप्रकारे दीप अमावास्येचे महत्त्व धर्मामध्ये सांगितले आहे.

**संगीता भोसले**/नागपूर

### तृतीयपंथीयांना आवर कोण घालणार?

नागपूर येथील छत्रपती आणि जयप्रकाश नगर मेट्रो स्टेशन चौक या चौकात सिग्नलवर कार अथवा स्कूटरने थांबल्यास तृतीयपंथीयांपासून महिला, मुले आणि पुरुष यांनी कसे सुरक्षित निघावे हा प्रश्न पडला आहे. सिग्नलवर थांबले की हे तृतीयपंथी झुंबडीने येऊन अंगाला स्पर्श करतात. चित्रविचित्र हावभाव करतात आणि यांच्याशी कोणी चढ्या आवाजात बोलले तर शिव्याशाप देत, धक्के मारून जातात. चौकात पोलिस असावे अशी अपेक्षा असते. कधी कधी पोलिस असतात पण ते फक्त चालान फाडणे हीच माझी जबाबदारी असल्यागत वागतात. प्रत्येक कामासाठी वेगळा पोलिस तैनात करणार का? लोकांच्या सुरक्षेविषयी यांची जबाबदारी नाही का?

विशेष म्हणजे तृतीयपंथीयांच्या या वागणुकीकडे ते नेहमीच कानाडोळा करतात. भीक मागणे जर कायद्याने गुन्हा असेल तर हे तृतीयपंथी भिकेच्या नावाखाली जो जोरजबरदस्तीचा धंदा करतात त्याला आळा घालायलाच हवा. कोणाच्या घरी काही लग्नकार्य, मंगलकार्य वगैरे असले की हे येऊन भरपूर पैसे लाटतात. दहा हजाराच्या खाली पैसे घेत नाहीत आणि पैसे मिळेपर्यंत हे तमाशा करतात. पोलिस प्रशासनाला नम्र विनंती आहे की, त्यांनी या लोकांकडे लक्ष द्यावे आणि ही खंडणी थांबवावी.

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# परतवारी निमित्त नर्सी नामदेव येथे भाविकांची दर्शनासाठी गर्दी

## आ. तान्हाजीराव मुटकुळे, तहसीलदार भूजबळ यांचेहस्ते महापूजा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जुलै**

तालुक्यातील नर्सी हे संत शिरोमणि नामदेव महाराजांचे जन्मस्थळ आहे. आषाढी एकादशीला पंढरपूरला दर्शनासाठी गेलेले भाविक पंधरा दिवसांनी येणाऱ्या कामीका एकादशीला संत नामदेव महाराजांचे दर्शन घेण्यासाठी दरवर्षी हजारोंच्या संख्येने येतात. या दर्शनानंतरच वारी पूर्ण होते अशी अख्यायिका आहे. त्यामुळे या परत वारीला महत्व आहे. सोमवारी सकाळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि तहसीलदार तथा संस्थानचे अध्यक्ष श्रीकांत भूजबळ यांच्याहस्ते महापूजा करण्यात आली. त्यानंतर दर्शनासाठी मंदिर खुल करण्यात आले. संत नामदेवांच्या दर्शनासाठी सकाळपासूनच हजारो भाविकांनी दर्शनासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या.

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी नर्सी नामदेव येथे संत नामदेव महाराजांच्या दर्शनासाठी हजारो भाविक सकाळपासूनच दाखल झाले होते. हरि नामाचा गजर करीत नर्सी नामदेव गाव आणि मंदिर परिसर दुमदुमला होता. भाविकांची दर्शनासाठी गर्दी लक्षात घेता प्रशासनाच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

रविवारी मध्यरात्री साडेबारा वाजल्यापासून भाविक रांगेत उभे होते. भाविकांची गर्दी वाढल्यानंतर पहाटे अडीच वाजता दर्शन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. दर्शनासाठी तीन रांगांनी भाविक मंदिरात येते होते. रामकृष्ण हरी, ज्ञानोबा माऊली तुकाराम तसेच हरि नामाच्या गजरात भाविक संत नामदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेते होते. दुपारपर्यंत एक ते दीड लाख भाविकांनी समाधीचे दर्शन घेतले होते.

सकाळी सात वाजता आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी सपत्नीक व संस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांनी महापूजा केली. यावेळी उपाध्यक्ष भिकाजी किर्तनकार, भिकाजी कदम, भिकुलाल बाहेती, ओम हेडा, द्वारकादास सारडा, ब्रीजमोहन तोष्णीवाल, राहुल नाईक, मनोज आखरे यांच्यासह विश्वस्त उपस्थित होते.

याठिकाणी दर्शनासाठी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी चार भव्य मंडपाची उभारणी करण्यात आली होती. दर्शन रांगेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था विविध संघटनाकडून करण्यात आली होती. ओम हेडा यांच्यातर्फे १०० क्विंटल साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. भाविकांच्या वाहतुकीसाठी परभणी, हिंगोली, जिंतुर, रिसोड व वसमत आगारांनी जादा बसेस सोडल्या होत्या. दुपारनंतरही भाविकांची दर्शनासाठी गर्दी कायम होती.

# उबाठा शिवसेनेच्यावतीने कृषीमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

## जिल्हाधिकारी कार्यालयातच प्रतिकात्मक आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जुलै**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यख सूरज चव्हाण यांच्याविरोधात ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आले. उबाठा शिवसेनेच्यावतीने दि २१ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पत्ते खेळून प्रतिकात्मक आंदोलन करीत राजीनाम्याची मागणी केली.

राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे हे विधानसभेत मोबाईलवर पत्ते खेळत असतांनाचे प्रसार माध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर शेतकरी तसेच विरोधकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून मोबाईलवर पत्ते खेळणाऱ्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरूध्द ठाकरे गटाकडून आंदोलन करण्यात आले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रवेश करीत कृषी मंत्री यांच्याविरोधात विविध आशयाचे बॅनर झळकवले. यावेळी उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू पाटील, उध्दवराव गायकवाड, विठ्ठल चौतमल, वसीम देशमुख, गणेश शिंदे, आनंद जगताप आदींनी कार्यालयात पत्ते खेळून तसेच गळ्यात पत्त्याचा माळा घालून माणिकराव कोकाटे यांचा निषेध करीत राजीनाम्याच मागणी करीत प्रशासनाला निवेदन सादर केले.

सेनगाव येथेही कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा निषेध करीत तहसील कार्यालयात पत्ते खेळत जोरदार घोषणाबाजी करीत राजीनाम्याची मागणी करण्यात आली. तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी केलेल्या मारहाणीचा निषेध करण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, प्रवीण महाजन, संतोष देवकर, पिंटू गुजर, जगन्नाथ देशमुख, जगदीश गाढवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सहकार भारतीची हिंगोली, परभणी कार्यकारणीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

परभणी येथे सहकार भारती परभणी व हिंगोली जिल्हा कार्यकारिणीतर्फे पदाधिकारी व सदस्यांकरिता दिनांक २० जुलै रोजी घेण्यात आलेल्या अभ्यास वर्ग कार्यक्रम ाकरिता उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

परभणी येथील पार्वती मंगल कार्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री श्री. विवेकजी जुगादे, प्रदेश पतसंस्था सहप्रकोष्ट प्रमुख श्री. जनकराजजी खुराणा, महाराष्ट्र प्रदेश सहसंघटन प्रमुख विजयराव देशमुख, सहकार भारतीचे प्रांत कार्यकारिणी सदस्य तथा जनकल्याण नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. अनिलजी अष्टूरकर, विभाग प्रमुख भगवानराव जायभाये, परभणी जिल्हाध्यक्ष श्री. दिलीपराव कुलकर्णी, हिंगोली जिल्हाध्यक्ष श्री. प्रकाशचंदजी सोनी यांच्या प्रमुख उप-स्थितीत करण्यात आले. यावेळी श्री. विवेकजी जुगादे यांनी सहकार भारती काल, आज व उद्या या संदर्भात मार्गदर्शन केले.

पहिल्या सत्रामध्ये परभणी जिल्हा कार्यवाह श्री. बाबाराव माटे यांनी संघ शताब्दीनिमित्त पंचपरिवर्तन या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी स्वबोध, कुटूंब व्यवस्था, समरसता, पर्यावरण, नागरी शिष्टाचार या संदर्भात सविस्तर माहिती दिली. दुसऱ्या सत्रामध्ये जनकल्याण नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. अनिलजी अष्टूरकर यांनी सहकार भारती कार्यकर्ता विकास व निर्माण या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये परभणी जिल्हा संघटकप्रमुख श्री. आनंद देशमुख यांनी सहकार भारती पदाधिकारी जबाबदारी व भूमिका यावर मार्गदर्शन केले तर चौथ्या सत्रामध्ये प्रदेश सहकोषाध्यक्ष श्री. औदुंबर नाईक यांनी कोष या विषयावर मार्गदर्शन केले. अभ्यास वर्ग कार्यक्रमाचा समारोप प्रदेश सहसंघटन प्रमुख विजयराव देशमुख यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अनिलजी अष्टूरकर यांनी केले. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन परभणी जिल्हा संघटकप्रमुख श्री. आनंद देशमुख यांनी केले. या कार्यक्रमासाठी हिंगोली व परभणी जिल्ह्यातील सहकार भारतीचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





**हिंगोली– नर्सी येथे कामीका एकादशीनिमित्त संत शिरोमणि संत नामदेव महाराज यांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना उबाठा शिवसेनचे विधानसभा प्रमुख तथा उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे यांच्यातर्फे साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### वसमत आयटीआयमध्ये कॅम्पसमधून निवड

हिंगोली– वसमत येथील स्वातंत्र्य सेनानी गंगाप्रसाद अग्रवाल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये आजी-माजी विद्यार्थ्यांसाठी भारतातील नामांकित व्हर्लपूल कंपनीला बोला-वून कॅम्पस इंटरव्यूचे आयोजन करण्यात आलेले होते. याप्रसंगी संस्थेचे प्राचार्य एस. एल. कोंडावार यांनी व्हर्लपूल कंपनीकडून आलेले कंपनीचे प्रतिनिधीचे स्वागत करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे मुलाखतीला सामोरे जाऊन या संधीचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले. कंपनीचे प्रतिनिधी श्री. कोल्हे यांनी कंपनीच्या धोरणाबद्दल माहिती सांगितली तर श्री. काळे यांनी निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणारे वेतन, सोयीसुविधा व इतर भत्ते याची माहिती दिली. त्यानंतर संस्थेतील एक वर्ष व दोन वर्ष व्यवसायाच्या द्वितीय वर्षातील एकूण ५१ विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून घेऊन मुलाखती घेण्यात आल्या. याचा अंतिम निकाल कंपनीमध्ये जाऊन घोषित करण्यात येणार आहे. त्यामुळे संस्थेतील एकूण जवळपास ४५ ते ५० विद्यार्थ्यांची निवड निश्चित आहे. या कॅम्पस इंटरव्यू दरम्यान संस्थेतील निदेशक जी. आर. कोरवार, जी. एन. येमेवार, आर. एन. कानगुले. एन. एस. सबनवार, एस. आर. पडघन, मुख्य लिपिक एस. आर. खूपसे, वरिष्ठ लिपिक श्रीमती आर. जे. शहारे, तसेच कार्यालयीन कर्मचारी ज्ञानेश्वर साळवे, नामदेव वाहेवळ व भालेराव यांनी सहकार्य केले.

### भाविकांना मक्का मदिना यात्रेसाठी मदत



वसमत– येथील माजी नगरसेवक ॲड मोहसीन यांनी गरजू व श्रध्दाळू भाविकांना मौला अली टुर्सच्या माध्यमातून उमरासाठी मक्का मदिना यात्रेसाठी रवाना करून त्यांना मदत केली आहे. दरवर्षी ज्या भाविकांना ही यात्रा करावयाची आहे अशांना ॲड मोहसीन यांनी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. या उपक्रमाचे भाविकांना स्वागत केले आहे तसेच मौला अली टुर्सचे नवीद अहेमद व माजीद पाशा यांनीही सहकार्य केल्याबद्दल त्यांचेही भाविकांनी आभार मानले आहे.

### अवैध दारू विक्री, जुगार अड्ड्यावर धाडी

हिंगोली–पोलिस विभागाने दारूबंदी कायद्यांतर्गत अवैध दारू विक्री करणाऱ्या ६ ठिकाणी छापे मारले असून आरोपींताकडून ५२१० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तसेच जुगार कायद्यांतर्गत ९ ठिकाणी पोलिस विभागाने छापे मारले. यावेळी ८५०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मुख्यमंत्री सहायत कक्षातून ७ रूग्णांना मदत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जुलै**

राज्यातील गोर-गरीब जनतेला दुर्धर आजारांवरील उपचारांचा खर्च भागविण्यासाठी विविध योजनांसोबतच तातडीच्या आर्थिक मदतीसाठी मुख्यमंत्री कार्यालयातीलमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष स्थ-ापन करण्यात आला आहे. या कक्षामार्फत राज्यभर प्रभावी अंमलबजावणी होत असून ही योजना गरजूसाठी मायेचा आधार बनली आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी एक संजीवनी ठरली आहे.

हिंगोली जिल्ह्यातील जनतेल-ाही या उपक्रमाचा लाभ मिळावा व रूग्णांच्या नातेवाईकांना अर्थसहाय्य मिळविण्यासाठी म ुंबईकडे पायपीट करावी लागू नये म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हिंगोली येथील जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष सुरु करण्यात आला आहे. या कक्षामार्फत जानेवारी ते जुलै २०२५ दरम्यान जिल्ह्या-तील गरजु व पात्र रुग्णांना गंभीर व दुर्धर आजारावरील वैद्यकीय उपचारासाठी एकूण ७ गरजु रुग्णांना ६ लाख १० हजार रुपयांचे अर्थ सहाय्य देण्यात आले आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाद्वारे जिल्ह्यातील सवंडकर नारायण मुंजाजी शांभवी गजानन सावळे, सय्यद मुसा सय्यद रसूल, सर्जेराव हंबीरराव ढोरे, हिरालाल सुभाष पवार, रामचंद्र मसाजी कुरवाडे, शामराव किसनराव सुर्यवंशी यांना मदत दिली आहे.

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची वन स्टॉप सेंटरला भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जुलै**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी येथील महिला व बाल विकास विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या सखी वन स्टॉप सेंटरला भेट देऊन आढावा घेतला.




या भेटी दरम्यान संकटात सापडलेल्या म हिलांसाठी वन स्टॉप सेंटर २४ तास कार्यरत असून महिलांना एकाच छताखाली सुरक्षित निवारा, तात्काळ पोलीस मदत, समुपद-ेशन, वैद्यकीय सेवा, कायदेशीर सल्ला तसेच आवश्यकतेनुसार त्यांना त्यांच्या कुटुंबात पुनर्वसन करण्यात येते. सन २०१९ पासून वन स्टॉप सेंटर कार्यरत असून आतापर्यंत ५५४ पीडित महिलांना लाभ देण्यात आलेला आहे.

यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस विभाग व सखी वन स्टॉप सेंटर यांच्याकडून कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमा अंतर्गत तसेच संकटात सापडलेल्या महिलांच्या संदर्भात काम काजाचा आढावा घेण्यात आला. यापुढेही या कामकाजाची अशाच प्रकारे प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याबाबत सूचना दिल्या. यावेळी संकटात सापडलेल्या महिलांना या योजनेचा लाभ मिळावा याकरीता जास्तीत जास्त महिलांपर्यंत सदर माहिती पोहचविण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृण कोकाटे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष दरपलवार, सहाय्यक लेखाधिकारी कमल शा-तलवार, विधी सल्लागार वर्षा पराते, कनिष्ठ संरक्षण अधिकारी नितीश मकासरे, राजेश पांडे, वन स्टॉप सेंटरचे केंद्र प्रशासक शिला रणवीर, समुपद-ेशक दिनेश पाटील, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. वन स्टॉप सेंटर मध्ये कोणताही गुन्हा दाखल न करता कायदेशीर मार्गाने गैरअर्जदार चे सम ुपदेशन करून संवादाच्या माध्यमातून कुटुंब जोडण्याचे काम वन स्टॉप सेंटर करीत आहेत. याचा लाभ गरजू महिला, विद्यार्थिनींनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

# महात्मा फुले समता परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत लव्हाळे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जुलै**



अखिल भारतीय महात्मा फुले संस्था परिषदेचे संस्थापक अध्यक्ष राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री आ.छगन भुजबळ यांच्या आदेशान्वये हिंगोली जिल्ह्याच्या अध्यक्षपदी चंदू लव्हाळे यांची निवड करण्यात आली.

महाराष्ट्रामध्ये ओबीसीच्या संघटन वाढीसाठी व ओबीसींचा आवाज बुलंद करण्यासाठी, तळागळातील सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची हिंग-ोली जिल्ह्याची कार्यकारणी व संघटन मजबूत करण्यासाठीच्या सूचनाही छगन भूजबळ यांनी दिल्या जिल्हाध्यक्ष लव्हाळे यांना दिले आहेत. हिंगोली शहराच्या वतीने चंदू लव्हाळे यांची जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला याप्रसंगी डॉ. रवी थोरात, बाळू सुर्वे, नागनाथ आप्पा नकाते, आकाश सोनटक्के, चंदू वाघ, भागवत बोधने, संतोष भुसांडे, अश-ोक भुसांडे, पवन मुळे, प्रभाकर जाधव, सय्यद रफिक,तुषार बनस-ोडे, नितीन गायकवाड, अभय मुळे, वसंत वाघ, सुमित बांगर, पवन मंडले, पंकज होडगीर, मधुकर राठोड, आकाश मोठे, शंकर गुजरवाड, चंदू उबाळे, अक्षय सु-शील कसबे, लवाळे, प्रल्हाद चोपडे, राजू चोपडे, बालाजी सोनुने, केशवराव जांबुतकर, एल एस देवकर, सुभाषराव कदम, प्रा. राजेश गोरे, अनिकेत लव्हाळे, गणेश बोरकर, संग्राम पांडुळे, स्वराज वाघ, रोशन कोंढाने, रोहित चौधरी, गणेश कोंढाने, अंकुश कुठे, शिवा मोठे, विवेक साहू, साईनाथ गा-वखुरे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# येलकी ते कसबेधांवडा रस्ता दुरूस्तीची राष्ट्रवादीची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जुलै**

कळमनुरी तालुक्यातील येलकी गावामधून कसबे धावंडाकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून हा रस्ता तत्काळ दुरूस्त करण्याची मागणी राष्ट्रवादीचे युवक जिल्हा उपाध्यक्ष बालाजी जाधव यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे केली आहे.

येलकी गावामधून कसबे धावंडा या गावाकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब झाला आहे. या रस्त्यावरून दुचाकी वाहन चालवणेही अशक्य बनले आहे. या मार्गावरून गावातील २०० मुले, मुली बाहेरगावी शिक्षणासाठी ये जा करतात. गावातील रूग्ण व वृध्दांचेही बेहाल या रस्त्यावरून जातांना होत आहेत. त्यामुळे या रस्त्याची तत्काळ दुरूस्ती करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

TARUN BHART 22 july 2025:Copy of Layout 1 7/21/2025 8:11 PM Page 1



# रेखा तौर यांच्या शिवसेना पक्ष प्रवेशामुळे शिवसेना महिला आघाडीची ताकद वाढण्यास मदत होणार -आ.अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या असंघटित कामगार विभागाच्या प्रदेश प्रमुख रेखा तौर यांनी असंख्य महिलासह शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला सदर प्रवेश
सोहळा दर्शना बंगल्यावर पार पडला याप्रसंगी बोलताना खोतकर यांनी सांगितले की या महिलांच्या प्रवेशामुळे शिवसेना महिला आघाडीचे आणखी ताकद मजबूत झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या प्रदेश उपाध्यक्ष असंघटित कामगार विभाग रेखा तौर यांच्यासह असंख्य महिलांचा शिवसेनेत प्रवेश झाला आहे ही शिवसेना साठी मजबूत बाजु आहे.यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत निश्चित फायदा होईल. असेआमदार अर्जुन खोतकर यांनी माहीती दिली आहे.यावेळी शिवसेना शहरप्रमुख



विष्णू भाऊ पाचफुले शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची उपस्थिती होती. यावेळी खालील महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.या सर्व महिलांनी प्रवेश केल्यामुळे आ. खोतकर यांनी त्यांचे स्वागत केले.

रेखा तौर ,लता जोशी ,कविता दाभाडे, गंगा काळे , सविता सिरसागर, उषा नाटकर, दीपाली नाईकवाडे , पर्वाता भुसारे, नंदा गवई ,अशोक काळे, सागर पाटोले, प्रदीप पवार, विजय सावळे ,बद्रि मस्के, ओमराजे तौर ,शैलेश बाहोती, रेखा जोशी, आदीचा शिवसेनेत प्रवेश झाला.

## संक्षिप्त

### मनुवाद्यांकडून भारतीय संविधानाला धोका - मगरे



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

राजश्री शाहू महाराज जयंतीनिमित्त जालना जिल्ह्यातील तालुका जाफराबाद येथे दिनांक २० जुलै २०२५ रोजी बहुजनांच्या वतीने जनसभा कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी पीपीआयडी चे राष्ट्रीय संघटन सचिव एम.बी.मगरे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. सुरुवातीला पीपीआयडी चे राज्य उपाध्यक्ष ड एफ.एच.सिरसाट यांनी शाहु महाराज यांच्या जनकल्याण कार्याची माहिती सांगतांना त्यांच्या शिक्षणविषयक कार्याची, शेतकरी कष्टकरी हिताचे कार्य, जाती निर्मूलन कार्य, बहुजनांसाठीचे आरक्षण धोरण इत्यादी जनकल्याण कार्याची माहिती सांगितली. आपल्या सविस्तर भाषणात एम.बी. मगरे यांनी रयतेचे राजा शिवाजी महाराज, राष्ट्रपिता ज्योतिबा फुले, राष्ट्रनायक राजेश्री शाहू महाराज यांच्या जनहित कल्याणकारी कार्याची माहिती सांगून, शाहु महाराजांच्या कल्याणकारी कार्याला राष्ट्रनिर्माता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता तत्वावर आधारित भारतीय संविधानात स्थापित केले.
हे भारतीय संविधान मनुवाद्यांकडून धोक्यात आल्याचे सांगून, या संविधान विरोधी धोरणाला तमाम बहुजनांनी रोखण्याची गरज असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास महादु सुरडकर, राजू रमणे, सुनील सिरसाट, विठ्ठल सिरसाट, भाऊसाहेब गवळी, आकाश बकाल यांच्यासह शारदा हिवाळे, सुमनबाई हिवाळे, कमलबाई हिवाळे, रेखा आळवे, इंदुबाई वाघ, लता हिल्लोडे, शिवलाल अक्षय, भगवान मिसाळ इत्यादींची उपस्थिती होती.

### आपल्या कार्यकाळात १९१ प्रकल्प राबविल्याचे समाधान- ॲड.अश्विनी धन्नावत



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पुणे येथे पार पडलेल्या ईन्नरव्हील प्रांत - ३१३ च्या ४१ चे वार्षिक अधिवेशन कौशिका मध्ये ईन्नरव्हील क्लब जालना होरायझनचा विविध पुरस्कारांनी माजी प्रांतीय अध्यक्ष डॉ. शोभना पालेकर यांच्याहस्ते गौरव करण्यात आला. ड. अश्विनी धन्नावत सर्वोत्कृष्ट अध्यक्ष, ड. पिंकी लड्ढा सर्वोत्कृष्ट सचिव पूनम खंडेलवाल सर्वोत्कृष्ट आयएसओ तर सौ. पूजा राठी सर्वोत्कृष्ट कोषाध्यक्षच्या तृतीय पुरस्काराच्या मानकरी ठरल्या.

या प्रांतात एकूण ७६ क्लब आहेत. सन २०२४-२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या क्लबचा वैयक्तिक व सांघिक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यात ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनने अनेक सर्वोत्कृष्ट पुरस्कार पटकावले आहेत. त्यात प्रतिष्ठेचा सर्वोत्कृष्ट अध्यक्षा व सचिव जोडी पुरस्कार, सर्वाधिक कार्यक्षम अध्यक्षा, सर्वोत्कृष्ट आयएसओ, सेवा प्रकल्पांतर्गत दिल्या जाणाऱ्या पुरस्कारात मानवता स्पंदन, सेवा विस्तार, बाल व युवक विकास, मातृ व बालसंवर्धन, महिला सशक्तीकरण, अद्वितीय प्रकल्प, जागतिक पर्यावरण प्रकल्प, सर्वोत्तम चालू प्रकल्प, १०१ शगुन प्रकल्प, आयआयएलएम दिशा प्रोजेक्ट, डिजिटल व सायबर जनजागृती, ब्रँडिंग व इमेज बिल्डिंग, सर्वांगीण उत्कृष्ठता पुरस्कार, अनाथाश्रम दत्तक, मैत्री व सांस्कृतिक उपक्रम, वैद्यकीय प्रकल्प या पुरस्काराचा समावेश आहे. याशिवाय या क्लबला हॅपी स्कूल, बाल व युवक विकास, सर्वांगीण उत्कृष्ठता ट्रॉफी प्रदान करण्यात आली तर अप्रतिम कार्याबद्दल ड. अश्विनी धन्नावत यांना वैयक्तिक ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

या अधिवेशनाला जालन्यातून प्रांतीय कोषाध्यक्ष नेत्रा भक्कड, आयएसओ जयश्री राऊत, ईन्नरव्हील क्लब जालना होरायझनच्या नूतन अध्यक्ष हेमा जयस्वाल, सचिव आरती भक्कड, सन २०२४-२५ च्या अध्यक्ष ड. अश्विनी धन्नावत, सचिव ड. पिंकी लड्ढा, आयएसओ पूनम खंडेलवाल यांची उपस्थिती होती.

## जि.प. व पं.स. निवडणुकीमध्ये ताकद पणाला लावून आपला उमेदवार निवडून आणा -भुतेकर

### कार्यकर्त्यांनी स्वबळावर निवडणुकीच्या तयारीला लागावे -ए.जे.बोराडे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

शिवसेनेचा जन्म केवळ निवडणुकीपुरताच झाला नसून राजकारणाला समाजकारणाची जोड मिळाल्याने लोकांच्या मनात शिवसेना रुजली. आगामी जि.प. व पं.स. निवडणुकीत ताकद पणाला लावून आपला उमेदवार निवडून आणा असे आवाहन संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर यांनी केले.

मंठा येथे शनिवार ता.१९ रोजी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सभापती ए. जे. बोराडे, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,



किसनराव मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री भुतेकर म्हणाले की, लोकांमध्ये मिसळून सातत्याने काम करणारा व लोक हिताचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाच या निवडणुकीत संधी देणार असल्याचे सांगून चांगल्या कार्यकर्त्याला न्याय मिळाला पाहिजे ही शिवसेनेची भूमिका आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मागील ३०-३५ वर्षापासून समाजकारण व राजकारण करत असताना सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. पक्ष फोडण्याची भाषाविरोधक करतात, मात्र शिवसेनेच्या जीवावर चालू असलेला हा झंजावात कदापिही थांबणार नाही असे सांगून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वतंत्र लढण्यासाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे असे आवाहन त्यांनी केले. हा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला असून या निवडणुकीत शिवसैनिक भाजपचा सुफडा साफ केल्याशिवाय स्वस्त बसणार नाही अशी ग्वाही दिली. या कार्यक्रमात बोलताना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी परतूर मतदारसंघात जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन केले. या मेळाव्याला माऊली वायाळ, पिराजी पवळे, भगवान बोराडे, शुभम गुंड यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अक्षय वाघमारे मित्र मंडळासह हजारो कार्यकर्त्यांना शिवसेनेत प्रवेश केला.

## माजीमंत्री राजेश टोपे यांनी केला राजेंद्र लटपटे यांच्या दोन्ही मुलांच्या सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील एकनाथ नगर येथील ता.अंबड येथील श्री.करण राजेंद्र लटपटे,श्री.रोहन राजेंद्र लटपटे व श्री. आनंद जनार्दन लाड यांनी अभ्यासातील सातत्य, कठोर परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून छएएढ परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांचे हे यश सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी ही परीक्षा देऊन उत्तम यश संपादन केले. या यशाबद्दल त्यांचे सत्कार महाराष्ट्र राज्य मा आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी त्यांच्या साल व श्रीफळं देऊन केला सत्कार वअभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या

## जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्यावर विश्वास ठेवत अनेक तरुणांचा शिवसेनेत प्रवेश!

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**



शिवसेना ( उबाठा ) गटाच्या जालना जिल्हा प्रमुखपदी युवा नेते महेश नळगे यांची निवड झाल्यानंतर परतुर तसेच मंठा तालुक्यातून जन सामान्यांचे लांढे शिवसेनेकडे आकर्षीत होताना दिसत आहेत . त्यातच काल रात्री अचानक काही युवकांनी युवा नेते तथा जिल्हा प्रमुख महेश नळगे यांच्या नेतृत्वाखाली अनेक तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश घेतला जिल्हा प्रमुख महेश नळगे सर्वसामान्यांना सोबत घेऊन चालणारे व मणमिळावू स्वभाव असल्याने जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून परतुर शहरातील युवकांचा शिवसेना ( उबाठा ) पक्षामध्ये जाहीर पक्षप्रवेश केला..
पक्षप्रवेश करतेवेळी उपस्थित महेशभ नळगे ( शिवसेना जिल्हाप्रमुख जालना ) माधवराव मामा कदम ( उपजिल्हाप्रमुख ) दत्ता पाटील सुरूंग ( शहरप्रमुख ) मधुकर पाईकराव दलित आघाडी राहुल कदम ( युवासेना ) दिपक काळे उपसरपंच यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते तसेच या वेळी या युवकांकडून बाकीचे पक्ष हे युवकांचा निवडणुकी पुरता वापर करून घेऊन नंतर मात्र त्यांच्या समस्या कडे दुर्लक्ष करतात मात्र शिव सेना हा एक मेव पक्ष आहे ज्या मध्ये तळा गळातील कार्यकर्त्यांला सुद्धा अगदी त्याला कुठली ही राजकीय पार्श्वभूमी नसेल तर त्यालाही मोठ्या प्रमाणात संधी दिली जाते आणि म्हणूनच मा महेश भैय्या नळगे हे जण सामान्यांना सोबत घेऊन चालणारे नेते शिवाय कुठल्याही अडचणीच्या वेळी एका फोनवर तात्काळ शक्य तितकी तत्पर मदत करण्याच्या स्वभावाने आमच्या सह सर्वच युवकांच्या मनात घर केलेले आहे त्या मुळे आज शिवसेनेत प्रवेश करत आहोत या पुढे मा महेश भैय्या नळगे व जेष्ठ नेते माधवराव मामा यांच्या सूचनेने जनतेच्या प्रश्नासाठी सदैव काम करत राहू असे सांगण्यात आले .

## ३२५ दिव्यागांना मोफत कृत्रिम अवयव शिबीरामध्ये वाटप

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथे स्व. राजेंद्रजी श्रीवास्तव वरिष्ठ महाविद्यालय व इंग्लीश स्कुल, लालबहादुर शास्त्री सांस्कृतिकयुवा क्रीडा मंडळ पारध, स्व.हरिवंश राय बच्चन सेवाभावी संस्था पारध,साधू वासवानी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ३२५ दिव्यागांना मोफत कृत्रिम अवयव शिबीरामध्ये वाटप करण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन बुलडाणा जिल्हा उबाठा शिवसेना जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवंत यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संभाजीनगरचे सुप्रसिद्ध डॉ जीवनसिंग राजपूत, ग्रापं. च्या सरपंच शारदाबाई कागफळे, ग्रामविकास अधिकारी संजय पूरी, भोकरदन शिवसेना उबाठा शहरप्रमुख महेश पुरोहित, सुभाष राऊत, कैलास ढमाले, गणेश फुके, नारायण हिवाळे, कैलास बारोटे, संदिप गोरे, राहुल कोथलकर, शे आबेद, लक्का जुबेर, जिपचे मा. कृषी सभापती तथा उबाठाचे उपजिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव इत्यादी हजर होते.

वरील नागरिकांच्या हस्ते दिव्यांग महिला, व पुरुषांना विविध साहित्यांचे वाटप करण्यात आहे. याप्रसंगी डॉ जीवनसिंग राजपूत यांनी आपल्या भाषणात व्यसनाचे प्रमाण जनतेमध्ये



वाढल्यामुळे अपंगत्व वाढलेले दिसत आहे. तरी व्यसनापासून दुर राहण्याचा मोलाचा सल्ला दिला प्रास्ताविकपर भाषणात श्री मनिष श्रीवास्तव यांनी आपल्या भाषणात नरात नारायण शोधुन त्यांची सेवा आम्ही आमच्या संस्थेमार्फत करीत असून ही सेवा अशीच चालू राहील दिव्यांगाच्या चेहऱ्यावरील आनंद पाहुन हीच आमची कमाई व सेवा आहे. हा कार्यक्रम यशस्वीरित्यां पार पाडण्यासाठी ग्रापं चें उपसरपंच शेखर श्रीवास्तव, नदिम पठाण, समाधान लोखंडे, समी पठाण, बाबुराव कागफळे, जगदिश सावकार, संदिप क्षीरसागर, विक्रान्त श्रीवास्तव, रवि तबडे, गणेश लोखंडे, दिनेश सुरडकर, परमेश्वर आल्हाट, हे युनुस म . युसुफ., जगन लोखंडे, संतोष ठाकुर, समाधान डोईफोडे, व संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी खुप परिश्रम घेतले. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील महिला, नागरिक मोठयां संख्येने हजर होते.

# अवैद्य धंद्यावाल्याचा कर्दनकाळ ठरले सुदाम भागवत

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या अवैधरीत्या गावठी हातभट्टी दारू विक्री करणाऱ्या विरुद्ध जिल्हा पोलिस प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली नव्याने रुजू झालेले पोलिस निरीक्षक सुदाम भागवत व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाई करत जवळपास पाच लाख रुपयाचा मुद्देमाल हस्तगत /नष्ट करून अवैध धंदेवाल्यांच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहे.

पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल,अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री खांबे यांच्या सूचनेनुसार गेल्या आठवड्यापासून अवैद्य दारू विक्री करणाऱ्या विरुद्ध मोहीम राबवली जात आहे.

पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी आपल्या पोलीस पथकाच्या माध्यमातून अवैद्य गावठी दारू विक्री करणाऱ्या



विरुद्ध ही मोहीम राबवली असून दिनांक १९ जुलै रोजी पोलीस ठाणे हद्दीत अवैधरीत्या गावठी हातभट्टी दारूची विक्री करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

माहितीच्या आधारावर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विविध ठिकाणी हातभट्टी दारू विक्री करणाऱ्यावर गुन्हे दाखल करून जवळपास पाच लाखाचा मुद्देमाल हस्तगत/नष्ट करून परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस निरीक्षक सुदाम भागवत यांनी परतुर पोलीस ठाण्याचा पदभार घेताच ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या हातभट्टी दारू बाबत माहिती घेतली आणि कोणाला थांब फक्त न लागता आपल्या सहकाऱ्यासह विविध ठिकाणी छापे टाकून सुरू असलेल्या हातभट्टी दारूवर मास रेड करत जवळपास १४ लोकांवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात आली यात यात १३१ लिटर हातभट्टी दारू व ४ हजार ७०० लिटर सडवा एकूण किंमत ४८८५५० असा मुद्देमाल जप्त/नष्ट करण्यात आला.

ही कारवाई पोलीस निरीक्षक सुदाम भागवत,पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते, पोलिस उपनिरीक्षक श्री मुंढे, पोलिस उपनिरीक्षक श्री पल्लेवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिंदे, पोहेका.फुफाटे , पोहेका,गाढवे, मपोका.वाघ, मपोका धडे, पोका.चव्हाण, पोका.इलग, पोका .गायकवाड, पोका.धापसे, पोका.आढे, पोका.बोंडारे.पोका.हाडे, पोका.जाधव, पोका.मोरे,पोका.राठोड यांनी केली.

### हद्दीत अवैद्य धंदे कायमचे बंद करणार -पो.नी.भागवत

यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी सांगितले की परतुर पोलीस ठाणे हद्दीत कोणत्याही गैरकृत्याला किंवा अवैधरित्या सुरू असलेल्या खुल्या व छुप्या धंद्यांना कायमचं बंद करण्यावर माझा भर राहणार आहे सदरील कारवाया हे निरंतर सुरूच राहणार आहे या कामी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक श्री सुदाम भागवत यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### बहुचर्चित बालाजी मंदिरच्या जमिनीबाबत पुन्हा उच्च न्यायालयात सुनावणी होणार

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील सुभाष रोडवरील श्री बालाजी मंदिर (श्रीराम) च्या मालकीच्या मौजे पारवा (ता.जि. परभणी) येथील सुमारे २५ एक्कर जमीनीच्या कथित विक्री प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने पुन्हा सूनावनी घ्यावी, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

मौजे पारवा शिवारात गट क्रमांक १५५ मध्ये श्री बालाजी मंदिर संस्थानच्या मालकीची सुमारे २५ एक्कर जमीन आहे. मंदिराचे महंत अखिलेश्वरदास यांच्याशी हातमिळवणी करीत काही व्यक्तींनी जमीन खरेदी केली. त्यामुळे भक्तगणात मोठ्या प्रमाणावर अस्वस्थता पसरली. त्याबाबत मंदिराचे निस्सिम भक्त मोहन शाळीग्राम सोनवने यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेऊन या खरेदी-विक्रीच्या व्यवहारावर आक्षेप नोंदविला. परंतु, औरंगाबाद खंडपीठाने सोनवने यांना प्रकरण दाखल करण्याचा अधिकार नसल्याचा निर्णय दिला. त्यामुळेच सोनवने यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने सर्व पक्षकारांच्या बाजू ऐकल्यानंतर औरंगाबाद खंडपीठाने ८ जानेवारी २०२४ रोजी दिलेल्या आदेशाला अमान्य करीत हे प्रकरण पुन्हा औरंगाबाद खंडपीठाकरीता सूनावनीसाठी पाठविले.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयासमक्ष निकाली निघालेल्या याचिकेस पुनर्जिवित करीत संपूर्ण प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढावे, असे आदेशित करीत दोन्ही बाजूस १८ ऑगस्ट २०२५ रोजी उच्च न्यायालयात हजर रहावे, असे निर्देश दिले आहेत. तसेच या प्रकरणात अंतीम निकाल येईपर्यंत गट क्रमांक १५५ या जमीनीच्या महसूल अभिलेखास उच्च न्यायालयासमक्ष प्रलंबित याचिकेच्या निकालापर्यंत जैसे थे ठेवण्याचे आदेश कायम ठेवले आहेत.

दरम्यान, सोनवने यांच्या बाजूने सर्वोच्च न्यायालयात ॲड. परमजितसिंह पटवालिया यांनी बाजू मांडली. त्यास ॲड. सुजीत देशमुख यांनी सहकार्य केले.

### परभणीत २७ जूलै रोजी महिलांसाठी खुली मेहंदी स्पर्धेचे आयोजन

#### यशस्विनी महिला मंचचा उपक्रम : दोन गटात होणार स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील यशस्विनी महिला मंचच्या वतीने रविवार, दि. २७ जुलै रोजी शहरातील श्री मंगल कार्यालय येथे दुपारी २ ते ४ या वेळेत खुल्या मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंचच्या अध्यक्षा डॉ. संप्रिया राहुल पाटील यांनी दिली.

यशस्विनी महिला मंचच्या वतीने सातत्याने महिलांसाठी विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांच्या ्खलेत यावेळी मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असणार आहे. स्पर्धा दोन गटांमध्ये होणार असून, एक गट यशस्विनी मंचच्या सदस्यांचा तर दुसरा गट खुल्या नागरिकांचा असेल. मंच सदस्य गटातील स्पर्धकांसाठी सहा विजेत्यांची निवड केली जाईल. यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिकांसह तीन उत्तेजनार्थ पारितोषिकांचा समावेश असेल. खुल्या गटातील विजेत्यांना तीन आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत.

या स्पर्धेसाठी कोणतीही प्रवेश फी आकारण्यात आलेली नाही, त्यामुळे इच्छुक स्पर्धक मोफत सहभाग घेऊ शकतात. मात्र, नोंदणी आवश्यक आहे. स्पर्धकांनी ठिक १.३० वाजता श्री मंगल कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. स्पर्धकांनी स्वतःचा मेहंदी कोन घेऊन यावे, आयोजकांकडून मेहंदी साहित्य पुरविण्यात येणार नाही. स्पर्धेचा कालावधी ४५ मिनिटांचा असेल. पेपरवर डिझाईन बनविण्यास परवानगी नाही. स्पर्धक स्वतःच्या हातावर मेहंदी काढू शकतात किंवा एखाद्या पार्टनरच्या हातावरही डिझाईन करू शकतात. डिझाईनसाठी घड्याळ लावण्याच्या भागाच्या थोडक्या खाली असलेल्या मनगटापर्यंत डिझाईन काढणे आवश्यक आहे. अंतिम निर्णय परीक्षकांचा असणार आहे व तो सर्वांना बंधनकारक राहील.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी बंधनकारक असून, ती दि. २६ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत करावी लागेल. इच्छुकांनी आ. डॉ. राहुल पाटील यांच्या शिवाजी नगर येथील तोरणा निवास कार्यालयात कृष्णा शिंदे (मो. ८०८०९२१९१४) यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदवावे, असे आवाहन यशस्विनी महिला मंचच्या अध्यक्षा डॉ. संप्रिया पाटील यांनी केले आहे.

### जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत घेतला आढावा

**परभणी,/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद परभणी, महानगरपालिका परभणी आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत शुक्रवार १८ जुले रोजी येथील बी. रघुनाथ सभागृहात आढावा बैठक पार पडली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती गीता साखरे होत्या. यावेळी महानगरपालिका क्रीडा अधिकारी राजकुमार जाधव, शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष रणजित काकडे, जिल्हा क्रीडा संकुल समितीचे नवनियुक्त सदस्य गणेश माळवे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन, नियोजन आणि ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेतील अडचणी यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये येणाऱ्या अडचणींवर तालुका संयोजकांनी आपली मते मांडली. क्रीडा साहित्याची उपलब्धता आणि खेळाडूंना सुविधा मिळाव्यात यावरही चर्चा झाली.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विभागीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाविषयी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती साखरे यांनी मार्गदर्शन केले.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# सेलू पालिकेच्या नळातून गढूळ पाणी

## जलशूद्धीकरण प्रकल्पाचा उपयोग होईना. नागरीकांच्या जिवाशी खेळ





**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू पालिकेच्या नळातून गढूळ पाणी जलशूद्धीकरण प्रकल्पाचा उपयोग होईना. नागरीकांच्या जिवाशी खेळत आहेत.

सेलू शहरात पालिकेच्या वतिने करण्यात येत असलेल्या सार्वजनिक नळातून गढूळ पाणी येत असल्याने लाखो रूपये खर्च करून उभारण्यात आलेल्या जलशूद्धीकरण प्रकल्पाचा उपयोग होत नसल्याने या गढूळ पाण्यामूळे शहरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचा प्रकार समोर येत आहे. शहरात पालिकेच्यावतिने निम्न दूधना प्रकल्पाच्या जलाशयातून पाणीपूरवठा करण्यात येतो तसेच शहरासाठी देवला पूनर्वसन येथे पालिकेचे जलशूद्धीकरण केंद्र आहे.जलशूद्धीकरण प्रकल्प केंद्राचा उद्देश हा शहरातील नागरीकांना शूद्ध पाणी पूरवठा उपलब्ध करून देणे हा आहे मात्र मागील अनेक दिवसापासून शहरातील नागरीकांना पालिकेच्या वतिने गढूळ पाण्याचा पूरवठा करण्यात येत असल्याने या गढूळ पाण्यामूळे शहरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.दरम्यान पालिकेच्या पाणी पूरवठ्यावर शहरातील गोरगरीब नागरीक पिण्याचे पाणी भरतात परंतू बेजबाबदार पालिकेच्यावतिने शहरात गढूळ पाणी पूरवठा करण्यात येत असल्याने नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे.तरी पालिकेचे मूख्याधिकारी तूकाराम कदम हे या गढूळ होत असलेल्या पाणी पूरवठ्याकडे लक्ष देतील का?हा प्रश्न सर्वसामन्य सेलूकरात निर्माण झाला आहे. गढूळ पाण्यामूळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात

सध्या पावसाळ्याचे दिवस असुन आखाड महिना सुरु आहे. गॅस्ट्रो, कॉलरा सारखे रोग डोके वर काढत असतांनाच, सेलू नगरपरिषद नळांद्वारे होत असलेला दुर्गंधीयुक्त गढूळ पाणी पुरवठा त्यात भर घालत असुन नागरीकांचे आरोग्य धोक्यात येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

सेलू नगरपरिषद नळाद्वारे असे पिण्याचे गढुळ पाणी पुरवठा होत असेल तर गोर गरीब, अल्पसंख्याक समाजातील नागरीकांच्या आरोग्याचे काय ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित होत असून .शहरात कोट्यावधींचे दोन फील्टर असुनही नगरपरिषद नळांद्वारे पिण्याच्या गढुळ पाण्याचा पुरवठा करत असेल तर पाणी कुठे मुरत आहे याची चौकशी झालीच पाहिजे.

**-शेख महेमूद सर**
**सामाजिक कार्यकर्ते सेलू**

## अंगलगाव येथील कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश



**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यातील अंगलगाव येथील असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये अधिकृत पक्षप्रवेश केला.

यावेळी श्री. कानिराम दिरा पवार, श्री. मिठू मेधा राठोड, श्री. पंढरीनाथ कानिराम जाधव, श्री. सूर्यभान शंकर राठोड, श्री. गणेश हरिभाऊ राठोड, श्री. देवराव बाबा जाधव, श्री. प्रकाश तोळा राठोड, श्री. सिताराम मानसिंग जाधव, श्री. गजानन श्रीराम चव्हाण, श्री. संतोष हरी राठोड, श्री. राजेश तोळा जाधव, श्री. राजेश कोंडीराम पवार, श्री. राजेश तुकाराम राठोड, श्री. अजय संजय राठोड, श्री. उद्धव शंकर राठोड, श्री. गणपत श्रीराम चव्हाण, श्री. विकास भगवान जाधव, श्री. जयदीप जाधव, श्री. किरण जाधव, श्री. पंकज पंढरीनाथ जाधव, श्री. विशाल संजय जाधव, श्री. रोहित रमेश चव्हाण, श्री. नितीन राजेश पवार, श्री. गजानन लिंबा राठोड, श्री. किशन तोळाराम जाधव, श्री. बालाजी धोंडीराम राठोड, श्री. राजेश रामा राठोड, श्री. वसंत रामराव चव्हाण, श्री. राहुल धोंडीराम राठोड, श्री. ब्रह्मजीत भाऊराव राठोड, श्री. कुंडलिक उत्तम जाधव, श्री. अक्षय संजय राठोड, श्री. बबन हरिभाऊ जाधव, श्री. नारायण कानिराम पवार, श्री. नामदेव काबू जाधव, श्री. अरविंद रजिरा आदी उपस्थित होते.

### फळा येथे अवैध रेती उपसा करणारे दोन तराफे नष्ट

**पालम,/प्रतिनिधी-** पालम पोलीस स्टेशनच्या हद्दीतील फळा गावाजवळील नदीपात्रात अवैधरित्या रेतीचा उपसा करणारे दोन तराफे स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने जप्त करून नष्ट केले.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली, अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थागुशाचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, पालम पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पी. डी. भारती, पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार तसेच पोलीस अमलदार परसराम गायकवाड, दिलीप निलपत्रेवार आणि लक्ष्मण कांगणे यांनी सहभाग घेतला. दरम्यान, नदीपात्रातून बेकायदेशीर पद्धतीने रेती उपसा करणाऱ्यांविरुद्ध अशी कारवाई सुरूच राहील, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला. या कारवाईमुळे रेती माफियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

## बोरीत तीन दिवसीय धार्मिक सोहळा उत्साहात संपन्न, हनुमान मुर्तीची स्थापना व कलश रोहण

**बोरी,/प्रतिनिधी:-** येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे असलेल्या दत्तनगर मधील शिवछत्रपती चौक येथील श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना व कलश रोहन कार्यक्रम आनंदमय व धार्मिक वातावरणात शुक्रवार दिनांक १८ जुलै रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमात दत्तनगर बोरी व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. जिंतूर तालुक्यात बोरी येथील दत्तनगर मध्ये श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार लोकसहभाग व लोकवर्गणीतून करण्यात आला आहे. यासाठी दत्तनगर मधील नागरिक गेल्या काही दिवसापासून परिश्रम घेत आहेत. हनुमान मूर्तीची स्थापना व मंदिराच्या कलश रोहन सोहळ्याला बुधवार दिनांक १६ जुलैपासून प्रारंभ झाला. या दिवशी कलश मिरवणूक मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात गावातील मुख्य मार्गावरून निघाली. याप्रसंगी ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी व मिरवणुकीतील महिला व नागरिकांनी फुगडी व पावल्यां चा आनंद घेतला. गुरुवार दिनांक १७ जुलै रोजी सकाळी श्री ची महापूजा तर सायंकाळी हरिपाठ घेण्यात आला शुक्रवार दिनांक १८ जुलै रोजी श्री निळकंठेश्वर महादेव मंदिर संस्थान उटी ब्रह्मचारी येथील मठाधिपती गुरुवर्य श्री सुरेशजी ब्रह्मचारीजी महाराज यांचे शुभ हस्ते मंदिराच्या कलशाची पूजा करण्यात आली. यानंतर लगेचच कलशारोहण सोहळा मोठ्या आनंदमय व धार्मिक वातावरणात संपन्न झाला. महाप्रसाद कार्यक्रमाचा गावातील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. या तीन दिवसीय धार्मिक सोहळ्यात आचार्य श्री सदाशिव मजगे, श्री पांडुरंग मजगे, श्री प्रदीप कुलकर्णी, श्री मुकुंद कुलकर्णी, श्री योगेश जोशी, श्री सारंग मुळी यांनी दैनंदिन धार्मिक कार्यक्रमांमध्ये पूजा व आरतीचे सुरेख नियोजन केले.



# जिंतूर तालुक्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट; काल सील लावले आज बोगस डॉक्टरने तोडले, गुन्हा तर दाखल नाहीच पण बिन बोंभाट धंदा सुरू

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट काल सील लावले आज बोगस डॉक्टरने तोडले, गुन्हा तर दाखल नाहीच पण बिन बोंभाट धंदा सुरू

जिंतूर :- वैद्यकीय परवाना नसताना बिन बोंबाटपणे दवाखाना चालवणाऱ्या बोगस डॉक्टर रवींद्र अधिकारी यांच्यावर वैद्यकीय पथकाने धाड टाकून दवाखाना सील करण्याला २४ तास उलटत नाही तोच या डॉक्टरने खुलेआम शासकीय सील तोडून दवाखाना सुरू करून आरोग्य विभागाला आव्हान दिले आहे.

येलदरी येथील बोगस डॉक्टर रवींद्र अधिकारी याच्यावर वैद्यकीय अधिकारी सय्यद शहाबाद व त्यांच्या पथकाने दिनांक १६ जुलै२०२५ रोजी दुपारी धाड टाकून संबंधिताला रंगेहात पकडले होते. मात्र वरिष्ठांनी सहकार्य न केल्याने तो बोगस डॉक्टर फरार झाला .विशेष म्हणजे या पथकाने रुग्णांना देण्यात येणारी स्क्रिप्ट वेगवेगळी औषधे जप्त केली. त्या ठिकाणी उपचार घेत असलेल्या रुग्णाशी संवाद साधून कशा पद्धतीने चुकीचे उपचार होतात .याची लेखी नोंद संबंधित पथकाने पंचनाम्यात घेतली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर संबंधित रुग्णालयात गैरप्रकार चालू असतानाही वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांना याचे सोयीर सुतक नाही. विशेष म्हणजे संबंधित पथकाने कारवाई केल्यानंतर बोगस डॉक्टर रवींद्र अधिकारी यांचा दवाखाना सील केला होता .परंतु अवघ्या २४ तासात संबंधित डॉक्टरने आरोग्य विभागाचे सील तोडून कचरापेटीत टाकले .व दवाखाना पुन्हा सुरू केला .नव्हे तर या डॉक्टरला आशीर्वाद कुणाचे? बोगस डॉक्टर असताना गुन्हा दाखल का झाला नाही? आरोग्य विभाग बोगस डॉक्टरला आशीर्वाद देत आहे का? २०२३ मध्ये अनेक बोगस डॉक्टर वर आरोग्य विभागाच्या पथकाने गुन्हे दाखल केले होते परंतु सदरील गुन्ह्यांमध्ये पोलीस प्रशासनाने सहकार्य करून अनेकांना जामीन मिळविण्यासाठी सहकार्य केले आणि बोगस डॉक्टर जिंतूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात सध्या व्यवसाय करत आहेत एकाच डॉक्टरवर कारवाई केली अनेक डॉक्टर बोगस असताना त्यांच्यावर कारवाई आरोग्य विभाग कधी करणार हा सर्वसामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न आहे असे अनेक प्रश्न निरुत्तर करणारे आहे.

आरोग्य विभागाचे मायाजाल ? संबंधित डॉक्टरला वैद्यकीय व्यवसायाचे खुले लायसन आरोग्य विभागाने दिल्याचे दिसते वरिष्ठ अधिकारी डॉक्टरच्या मायाजालात अडकल्याचे समजते मायाजाल असल्यामुळे कारवाई करावी कशी? हा ही प्रश्न आहे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा अधिकार अशा डॉक्टरांना दिला कोणी वरिष्ठ पातळीवर जिल्हाधिकारी याची नोंद घेणार आहेत का? याबाबत आता सामान्य जनता प्रश्न विचारू लागली आहे.

बोगस डॉक्टरांच्या संदर्भात आपण सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे आरोग्य विभागाने दोन वेळा गुन्हे दाखल केलेल्या व तिसऱ्यांदा अवैधरीत्या व्यवसाय करीत असताना सापडला असतानाही संबंधित डॉक्टरवर कठोर कारवाई न केल्यास आपण आंदोलन करू व प्रशासनास कारवाई करण्यास भाग पाडू



प्रीतम वाकळे
रिपब्लिकन सेना युवा जिल्हाध्यक्ष

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## स्त्यांसाठी जनता उतरली रस्त्यावर

# देगलूर-उदगीर महामार्ग अडीच तासासाठी केला जाम



**तभा वृतसेवा**
**देगलुर, दि.२१ जुलै -**

तालुक्यातील दळणवळणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे असलेले देगलूर ते हणेगाव, देगलूर ते मुक्रमाबाद व बल्लूर फाटा ते मानूर या रस्त्याच्या मजबूती करणासाठी, त्याचबरोबर रस्त्यांच्या दुतर्फा झालेल्या काटेरी कुंपणाची तोडणी करून रस्ता मोकळा करून देण्याच्या प्रमुख मागण्यांसाठी करडखेड येथील छत्रपती संभाजी राजे चौकामध्ये आक्रोश रास्ता रोको आंदोलनाला परिसरातील शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभागी होत अडीच तासासाठी हा रस्ता संपूर्ण चक्काजाम करण्यात आला.

या रास्ता रोको आंदोलनामध्ये विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व परिसरातील सरपंचांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून परखडपणे आपली भूमिका मांडून हा रस्ता रोको आंदोलन यशस्वी घडून आणला. देगलूरचे तहसीलदार भरत सूर्यवंशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता निळकंठवार व राष्ट्रीय महामार्गाचे उपअभियंता पेद्देवाड हे प्रत्यक्ष आंदोलना स्थळी उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांना लिखित आश्वासन दिल्यानंतर हे रास्ता रोको आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

या रास्ता रोको आंदोलनामध्ये माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार, शिवसेनेचे महेश पाटील, संभाजी ब्रिगेडचे संकेत पाटील सोमूरकर, माजी सभापती विवेक पडकंठवार, अशोक देसाई देगावकर, रमेश सोनकांबळे शिवणीकर, माधव फुलारी, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष बालाजी इंगळे, शहराध्यक्ष संजय जोशी, रणजीत पाटील कुशावाडीकर, सचिन पाटील किनीकर, राहुल देसाई देगावकर, भास्कर पाटील केदारकुंठेकर, उत्तमराव वाडीकर, काँग्रेसचे भरत पाटील मोहसीन मरखेलकर, दत्ता हाळंबरे, माधव केरूरे, बालाजी पाटील, उमाकांत भूताळे, पांडू पाटील, सरपंच चंद्रकांत गजलवार, मिरज पाटील, माधव वाडेकर व मोठ्या संख्येने नागरिक व पत्रकार बांधव उपस्थित होते.

हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी मानवी हक्क अभियानाचे मच्छिंद्र गवाले, काँग्रेस पक्षाचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे कावळगावकर, संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष जेजेराव शिंदे, माजी जि प सदस्य नागनाथ वाडेकर, शहाजीराव बाबरे, निशिकांत कांबळे, दशरथ सूर्यवंशी, संतोष चिद्रावार, करडखेडचे युवा नेतृत्व श्रीनिवास मंदिलवार, अहमद खुरेशी, सुरेश सावकार शिंदे, किशन पांचाळ, बाबूराव चिनगुलवार, दिपक मोघे, शेख वजीर साब, मारोती कांबळे, बालाजी ईबितवार, अशोक कोकणे, दिगंबर कोकणे, ईश्वर मुंडकर, यादव गाडे, नागनाथ चांदावाड, आशोक आबाजी, रामा दारगलवर, विलास कोकणे, जयदीप गाडे, महेबुब बागवान, आहेमद चौधरी, संभाजी चिंतले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तीन हायवा, ११ ब्रास रेती जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ जुलै -**

अवैध धंद्याच्या विरुध्द जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी दिलेल्या निर्देशानुसार भाग्यनगर आणि लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन हायवा टिप्पर आणि ११ ब्रास रेती जप्त करुन आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध धंद्याच्या विरुध्द जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी धडक मोहिम सुरु केली असून दोन दिवसापूर्वीच जिल्ह्यात अवैध दारु विक्रीच्या प्रकरणात मोठी कारवाई केल्यानंतर काल रात्री भाग्यनगर आणि लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी गस्त घालून पोलिसांनी तीन हायवा आणि ११ ब्रास रेती जप्त केली आहे. भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आरोपी अश्विन गायकवाड, अर्जुन क्षीरसागर हे हायवा टिप्पर क्र.एमएच-२६-बीई-७७६६ यामधून पाच ब्रास रेती विना परवाना बेकायदेशीरित्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करताना आढळून आले. पोलीस निरीक्षक तांबे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने हा हायवा टिप्पर क्रमांक पकडून आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुगाव ते पावडेवाडी रोडवर आरोपी शेख वहाब शेख हकीम मियॉ रा.नेरली, हणमंत बालाजी तेलंग रा.तरोडा हे टाटा टिप्पर क्रमांक एमएच-०४-डीएसपी-५९८० यामध्ये तीन ब्रास रेती घेवून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करताना आढळून आले. पोलीस उपनिरीक्षक निझाम मुस्सा सय्यद लिंबगाव यांच्या फिर्यादीवरुन लिंबगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याच पोलीस स्टेशनच्या अंतर्गत सुगाव ते पावडेवाडी रस्त्यावर आनंदा मुसळे व दत्तराव देशमुख रा.तरोडा हे टिप्पर क्र.एमएच-१२-एलटी-१८२६ मधून तीन ब्रास रेती विना परवाना बेकायदेशीरित्या चोरटी वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर लिंबगाव पोलिसांनी त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करुन टिप्पर व रेती जप्त केली आहे. भाग्यनगर व लिंबगाव पोलिसांनी ४८ लाख रुपये किंमतीचे टिप्पर आणि ६० हजार रुपयांची वाळू असा एकूण ४८ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी भाग्यनगर व लिंबगाव पोलीस ठाण्याचे अभिनंदन केले आहे.

# अखेर ते...पसार झालेले पाचपैकी चार ट्रॅक्टर जप्त

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२१ जुलै -**

तालुक्यातील धानोरा या पैनगंगा नदीकाठच्या ठिकाणी नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून चोरीची वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडण्यासाठी दि.१५ जुलै रोजी दुपारी ०२:००च्यासुमारास कार्यवाहीसाठी गेलेल्या तहसीलदार व महसूल पथकाला हुलकावणी देत पाचही ट्रॅक्टर घेऊन वाळू तस्कर विदर्भातल्या भागात पसार झाले होते.या पाच पैकी चार ट्रॅक्टर पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी आज २१जुलै रोजी जप्त करत माहूर पोलिस ठाण्यात आणून गुन्हा दाखल केल्याने वाळू तस्करांमध्ये एकाएकी 'सन्नाटा' पसरला असल्याचे दिसून येत आहे.

दि. १५ जुलै रोजी दुपारी ०२.०० वाजताचे सुमारास माहूरचे तहसिलदार मुगाजी काकडे यांना मिळालेल्या माहितीवरुन तहसीलचे पथक धानोरा येथील जायमोक्याच्या ठिकाणी गेले असता त्यांना ट्रॅक्टर क्रमांक एमएच २९ टीई ०२१२, एमएच ३८ बी १०८० व पासींग क्रमांक नसलेले तीन ट्रॅक्टर असे एकुन पाच ट्रॅक्टरचे चालक मालक हे विनापरवाना अवैधरित्या पैनगंगा नदीच्या पात्रातील वाळू चोरी करुन वाहतूक करत असल्याचे दिसून आले. यावेळी त्यांना याविषयीची चौकशी करत पकडण्यासाठी गेले असता



सदरील पाचही ट्रॅक्टर मधील वाळू जागेवरच रिकामी करुन देत ट्रॅक्टर घेऊन वाळू तस्कर विदर्भातल्या दिशेने पसार झाले होते.याबाबतची रितसर फिर्याद ग्राम महसूल अधिकारी डी. व्ही.पेंटेवाड यांनी दिल्याने माहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी गुन्हा दाखल केला होता.

वाळू तस्करांनी लपवून ठेवलेले पाच पैकी चार ट्रॅक्टर आज सोमवारी माहूरचे पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी आपल्या पोलिस पथकासह जप्ती कारवाई करून पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहेत.

या कारवाईत पोलीस निरीक्षक गणेश कराड,सपोनि पालसिंग ब्राह्मण, तपास अधिकारी पोउनि संदीप अन्येबोईनवाड, पोहेका गजानन चौधरी, पोहेकॉ बाबू जाधव,चालक ज्ञानेश्वर भोपळे ,पोका पवन राऊत,सोनटक्के, जाधव,पोहेका पुष्पा पुसणाके, पोका राठोड आदींचा सहभाग होता.

## संक्षिप्त वृत्त

### म. ज्योतिबा फुले शिक्षक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी रमेश गायकवाड

**बिलोली-** महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक परिषद,महाराष्ट्र संघटनेचे राज्य अध्यक्ष व्यंकटराव जाधव,महिला आघाडीच्या प्रमुख सुनिता वाबळे,यांच्या शिक्षक संघटनेच्या नांदेड जिल्हाध्यक्ष पदी रमेश गायकवाड यांची निवड करण्यात आली. नांदेड येथे महात्मा ज्योतिबा फुले परिषद अंतर्गत महात्मा ज्योतिबा शिक्षक संघटनेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या शिक्षण परिषदेत ही निवड करण्यात आली. निवडीच्या वेळी महात्मा फुले परिषदेचे महाराष्ट्र व्यंकटराव जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून देगलुरदिव्यांग विद्यालयाचे मुख्याध्यापक गायकवाड व विभागीय अध्यक्ष प्रा.शेषेराव माने तर राज्य कार्यकारणी सदस्य मुरलीधर गोडबोले,राजेंद्र वर्ताळकर,व्यंकटराव वडजे,यादव सोळंके,नागनाथ स्वामी, तसेच राज्य महिला सदस्य डॉ.मनिषा तिवारी,वैशाली माने आदि मान्यवर उपस्थित होते. या निवडीबद्दल पत्रकार बाबुराव इंगळे, विठ्ठल चंदनकर, अशोक दगडे, रत्नाकर जाधव, गंगाधर कुडके, सामाजिक कार्यकर्ते मुकिंदर कुडके, कृषी उत्पादन बाजार समितीचे संचालक बाबुराव कुडके सह तालुक्यातील तसेच जिल्हातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.



### डॉ. शिवराज गंगवाळ यांचे युपीएससी यश



**नायगाव-** ग्रामीण भागातील अल्पसुविधा,प्रतिकूल परिस्थिती आणि मर्यादित साधनांमध्ये जिद्द, चिकाटी आणि अभ्यासाच्या जोरावर युपीएससी परीक्षा उत्तीर्ण होणारे डॉ. शिवराज राजेश गंगवाळ हे आज नांदेड जिल्ह्यासाठी गौरवाचे आणि अभिमानाचे नांव ठरले आहे. त्यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल नारायण वडपत्रे परिवाराच्या वतीने दि .१८ रोज शुक्रवारी सकाळी अंबिका मंगल कार्यालय, नायगाव येथे भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्ह्याचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नुतन जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, भाजप नेते बालाजी बच्चेवार, माजी जि. प. शिक्षण सभापती संजय बेळगे, उद्योजक बालाजी ईबितदार, गंगाधर माऊले, सय्यद रहीम, सूर्यकांत सोनखेडकर, आदी मंडळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव ढगे यांनी केले.


### लोहा न्यायालयात कायदेविषयक शिबिर

**लोहा -** दिवाणी न्यायालय. क स्तर येथे कायदे विषयक मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले. या शिबीरात जुडिसिअल मॅजिस्ट्रेट फर्स्ट क्लास पी. व्ही. चिद्रे यांनी अहवान केले राष्ट्रीय लोकन्यायालयात जास्तीत जास्त प्रकरणे ठेवून तडजोडी अंती निकाली काढण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशात एकाच वेळी '' देशासाठी मध्यस्थी'' हे ९० दिवसाचे विशेष अभियान चालविण्यात येत असल्याचे सांगितले. अधिकाधिक पक्षकारांनी या मोहिमेत सहभागी होऊन आपआपली प्रकरणे आपसात तडजोडी अंती निकाली काढून राष्ट्रीय अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले. यावेळी न्या. पी. व्ही. चिद्रे, न्या. एन. बी. चव्हाण, अभियोक्ता संघाचे अध्यक्ष एस. के. ताटे, सपोनि संजय निलपत्रेवार, सहायक सरकारी अभियोक्ता एस. एस. पाटील, विविध बॅंकेचे अधिकारी कर्मचारी व पंचायत समिती, लोहा व नगरपालिका लोहाचे अधिकारी कर्मचारी तसेच अभियोक्ता संघ लोहाचे सर्व सदस्य उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी लोहा न्यायालयाचे सहायक अधिक्षक विनोद सारकूटवार, क. लिपीक, वसंत वडजे, कपील सोनवणे, शिपाई यांनी विशेष परिश्रम घेतले.



### पुरुषोत्तम पारसेवार यांचे निधन

**देगलूर-** येथील नाथनगर येथील ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक पुरुषोत्तम प्रल्हादराव पारसेवार (८६ वर्ष) यांचे आज सकाळी राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा ,सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर आज सोमवार ४ वाजता येथील वैकुंठ धाम येथे अंतिम संस्कार करण्यात आले. येथील मानव्य विकास विद्यालयाचे सह शिक्षक गिरीश पारसेवार यांचे ते वडील होत.



## शारदा भवन शाळा व शंकरराव चव्हाण महाविद्यालयासमोर गतिरोधक बसवा : विरकर

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.२१ जुलै -**

शहरातील नांदेड - नागपूर रोडवरील शारदा भवन प्राथमिक व माध्यमिक शाळा व शंकरराव चव्हाण महाविद्यालया समोर तात्काळ गतिरोधक व वेग मर्यादा फलक बसविण्यात यावे.या मागणीचे निवेदन शारदा भवन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा अर्धापूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष गुणवंत विरकर यांनी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदन दिले आहे.



या मार्गावरुन दररोज एक ते दोन हजार विद्यार्थी ये-जा करतात. या महामार्गावर वाहनांची नेहमीच मोठी वर्दळ असते. पहिली १ ली ते १० वी पर्यंत शाळा असल्याने छोट्या मुलांची संख्या लक्षणीय असल्याचे निवेदनात नमुद केले आहे.

या निवेदनाच्या प्रति महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण, भोकर विधानसभेच्या आमदार ॲड. श्रीजया चव्हाण, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना दिल्या आहेत.

## सरेगावच्या मठाधीपती सच्चिदानंदबन महंत दत्त मंदिर गादी सोहळा

**मुदखेड, दि.२१ जुलै -** मुदखेड सरेगाव येथील दत्त मंदिर संस्थांच्या मठाचे मठाधिपती म्हणून संत महंत सच्चिदानंदबन गुरु यदुबन महंत महाराज यांचा अधिष्ठान गादी सोहळा दत्त नामाच्या गजरात , भक्तिमय वातावरणात पार पडला. दत्त भक्तांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले आहे. श्री श्री १०८ महंत स्वामी शांतीब्रह्म यधुबन गुरु गंभीरबन मंथ महाराज कोलंबी यांच्या कृपा आशीर्वादाने श्री पंचदशना जुना आखाडा वाराणसी (काशी) यांनी मठाधीपती संन्यासी महंत म्हणून प्रमाणपत्र बहाल करण्यात आले आहे. यानिमित्त दि.२० जुलै रोजी गादी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा ,दत्त भक्तांच्या वतीने सामूहिक सत्कार सोहळा व कीर्तन महोत्सव महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कीर्तनकार संत शहापुरी गुरुमंत रमणपुरी महाराज दत्त मठ निरंजन माहूर, श्रीकृष्ण ज्ञान मंदिर मठाचे महंत गोपीराज बाबा जामोदेकर तसेच अनेक संत , महंत, दत्तभक्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैधरित्या मोबाईल टॉवर उभारण्यावर कारवाई करा ; गावकऱ्यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२१ जुलै -**

अवैधरित्या मोबाईल टॉवर उभारणार्यावर कारवाई करण्याची मागणी धनेगाव मुजाम पेठ येथील जय हनुमान सोसायटीच्या नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालय धनेगाव, नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे, जिल्हाधकारी कार्यालय नांदेड यांच्याकडे एका निवेदना मार्फत करण्यात आले आहे. सदरील मोबाईल टॉवर उभारल्यास आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.



धनेगाव ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत जय हनुमान सोसायटी मध्ये भर वस्तीत मोबाईल टावर उभारण्यात येत आहे. सदरील टावर मधून बाहेर पडणारे रेडिएशन पल्सेस हे लहान मुलांच्या आरोग्यास धोकादायक असल्यामुळे हा मोबाईल टावर भरवस्तीत उभारू नये अशी तक्रार जय हनुमान सोसायटी येथील नागरिकाने गावचे सरपंच गंगाधर पिंटू पाटील शिंदे यांच्याकडे केली होती. तर सदरील प्रकरण सरकार दरबारी न्याय मिळावा म्हणून माझी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे हे ही प्रयत्न करत आहेत. टावर उभारण्यात येऊ नये ही तक्रार टावर उभारणी करणाऱ्यांनी नोटीस न मानता केराची टोपली दावत टॉवरची उभारणी करण्यात येत आहे त्यानंतर गावकऱ्यांनी आक्रमक रूप धारण करून केल्याने टॉवरचे काम तूर्तास बंद ठेवण्यात आले आहे. तरी मोबाईल टॉवर उभारणी करण्यासाठी टॉवर कंपनीचे अधिकारी - कर्मचारी उभारणीस प्रयत्न करत आहेत. तेव्हा हा मोबाईल टॉवर कोणत्याही परिस्थितीत येथे उभारण्यास परवानगी प्रशासनाने देऊ नये; अशी मागणी जयरा जयहनुमान सोसायटी धनेगाव येथील नागरिकांनी केली आहे. जर टॉवरची उभारणी केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## भूमाबाई पुलगमवार यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.२१ जुलै -**



तालुक्यातील करडखेड येथील ज्येष्ठ महिला नागरिक श्रीमती भुमाबाई हनमनलू पुलगमवार(८३ वर्ष) यांचे काल २० जुलै रोजी रात्री १० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले .

आज २१ जुलै रोज सोमवारी दुपारी ४:३० वाजता करडखेड येथील सार्वजनिक स्मशानभूमी येथे अंतिम संस्कार करण्यात येणार असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले. त्यांच्या पश्चात दोन मुले,तीन मुली, सुना,जावई असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त शिक्षक गंगाधर पुलगमवार व देगलूर येथील मानव्य विकास विद्यालयाचे सह शिक्षक राजेश्वर पुलगमवार यांच्या त्या मातोश्री होत.

## पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आज आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ जुलै -**

जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व शंकर महाविद्यालय, कौठा, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावा, प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन उद्या मंगळवार २२ जुलै २०२५ रोजी करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजेपासून शंकर महाविद्यालय, कौठा नांदेड येथे रोजगार मेळावा, प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळावा, प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये नामांकित उद्योजक तसेच इतर आस्थापनांच्यावतीने मुलाखती घेण्यात येणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी २२ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपासून शंकर महाविद्यालय, नांदेड येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , आनंदनगर रोड, बाबा नगर नांदेड कार्यालयाचा ई-मेल आयडी परपवशवीक्षसरी०१सारळश्र. ले आणि कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ व योगेश यडपलवार यांचा क्रमांक ९८६०७२५४४८ यावर संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

# सारखणी जिल्हा परिषद गटाचे नाव बदलुन दहेली करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२१ जुलै -**

किनवट तालुक्यातील जिल्हा परिषद गट क्रमांक ०३ याचे सध्याचे नाव सारखणी असे उमरी बाजार हे नाव बदलुन नुकत्याच झाहीर करण्यात आलेल्या प्रारुप यादीमध्ये जाहीर करण्यात आले आहे. या गटाचे नाव दहेली करावे, अशी मागणी दहेली ग्रामपंचायतीकडून उपसरपंच राकेश तोटावार यांच्याकडुन करण्यात आली आहे. यासंदर्भात उपसरपंच राकेश शेकन्ना तोटावार यांनी दि. २१ जुलै रोजी तहसीलदार किनवट यांच्याकडे लेखी हरकत दाखल केली आहे.

जिल्हा परिषद प्रारूप रचना नमुना (दिनांक १४ जुलै २०२५) नांदेड जिल्ह्याच्या सूचनेनुसार, जिल्हा परिषद गटाच्या नावाची घोषणा करताना त्या गटात सर्वाधिक मतदारसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या नावावरून गटास नाव देण्याचा नियमानुसार निर्णय घेतला जातो. मात्र, गट क्र. ०३ मध्ये दहेली ग्रामपंचायतीची मतदारसंख्या २१५२ असून सारखणीची मतदारसंख्या केवळ २०५५ इतकी आहे.



अशा परिस्थितीत नियमानुसार दहेली ग्रामपंचायतीला या गटाचे प्रतिनिधीत्व मिळावे आणि गटाचे नाव दहेली असे ठेवले जावे, अशी स्पष्ट मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच वर्ष २००४ पुर्वी या जिल्हा परिषद गटाचे नाव दहेली असेच होते हे ही विचारात घेतले गेले पाहिजे. ही मागणी केवळ नावाच्या बदलासाठी नसून, स्थानिक ग्रामस्थांच्या प्रतिनिधित्वाचा योग्य सन्मान व्हावा या हेतूने केली गेल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडेही सादर करण्यात आली असून प्रशासनाकडून याबाबत लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दहेली ग्रामपंचायतीतील नागरिक व स्थानिक पदाधिकारी या मागणीसाठी एकवटले असून, गटाच्या नावामध्ये योग्य ते बदल होईपर्यंत पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे उपसरपंच राकेश तोटावार यांनी सांगितले.

# मातुळ येथील शेतकऱ्यांच्या आखाड्यावर चोरी ; उभ्या पिकावर चालविले ट्रॅक्टर

## लोकस्वराज्य आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षासह चौघांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ जुलै -**

भोकर तालुक्यातील मातुळ येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील उभ्या पिकावर ट्रॅक्टर चालवून पत्राच्या शेडची मोडतोड करून त्यामधील ठेवलेल्या खतांच्या पोत्यांची व औषधांची चोरी केल्याने लोकस्वराज्य आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षा यांच्यासह चौघाविरुद्ध भोकर पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोकर तालुक्यातील मातुळ येथील गट क्रमांक २४४ शेतजमिनीचे मालक शेतकरी आनंदा म्हैसाजी फुले ( ६० ) हा वयोवृद्ध शेतकरी आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह फक्त शेतातील उत्पन्नाच्या माध्यमातूनच शेतात कबाड कष्ट करून चार पैसे गोळा करून कसेबसे आपला जीवन जगत होता. पावसामुळे आपल्या शेतातील अन्नधान्य, बी बियाणे खत औषधे व शेत उपयोगी साहित्य सुरक्षित रहावे यासाठी शेतात पत्राच्या शेडची उभारणी केली. त्यांच्या काबाडकष्टामुळे शेतातील पीक डोलू लागल्याने काही जणांना ते पचनाशे झाले दिनांक १८ जुलै रोजी रात्री मातुळ व इतर गावातील रामा विठ्ठल फुले, शिवराम गंगाधर करेवाड, वर्षा रामा फुले, संगीता मोहन पवळे या लोकांनी शेतात येऊन पत्री शेड पाडून त्यामधील खताच्या पोत्यावर सबलीने मारून पोते फाडून, औषधाच्या डब्याची तोडफोड करून शेतातील उभ्या ज्वारीच्या पिकावर ट्रॅक्टर चालविले व डोलू लागलेले कापसाचे पीक भुईसपाट केले व शेड मधील खताचे पोते गाडीमध्ये नेल्याची माहिती शेत शेजारी असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांना दिली. शेतकरी आनंदा म्हैसाजी फुले शेतात जाऊन पाहणी केली असता शेतातील पत्राच्या शेडची मोडतोड करून त्यातील युरिया खताचे सहा पोते व डीएपी खताचे सहा पोते व फवारणीसाठी ठेवलेले औषधीचे तीन डब्बे फोडून एकून ४० हजार रूपयाचे नुकसान करून साहित्य एम एच ०२ सीआर ६९९८ चारचाकी व्हॅगनर गाडी मध्ये चोरून नेले असल्याची तक्रार शेत जमीन गट क्रमांक २४४ मधील २ हेक्टर ३ आर चे मालक आनंदा म्हैसाजी फुले यांनी भोकर पोलीस स्थानकात दिलेल्या तक्रारीवरून रामा विठ्ठल फुले, शिवराम गंगाधर करेवाड, वर्षा रामा फुले सर्व राहणार मातुळ व लोकस्वराज्य आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षा संगीता मोहन पवळे राहणार बोरगाव किवळा ता. लोहा जि. नांदेड यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२),३(५) प्रमाणे दिनांक १९ जुलै रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यातील महिला आरोपी आपल्या पदाचा गैरवापर करत असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

सदर घटनेच्या पुढील तपास पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल अतिश राचलवाड हे करीत आहेत.

पावसाने दडी मारल्या नंतर शेतकरी हताश झाले यात सदरील पीडित शेतकऱ्यांच्या शेतातील डोलू लागलेले पीक या गावगुंडांनी भुईसपाट केल्याने हे नुकसान भरून न निघणारी आहे व शेतातील महागामोलाचे औषधे चोरून नेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याने सदरील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.ही झालेली नुकसान भरपाई करून देण्याची मागणी सदरील शेतकऱ्याकडून होत आहे.